- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,३१,७०० /-
✔ २२ कॅरेट : १,२२,३५० /-
✔ चांदी : १,७८,३००/-

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शुक्रवार, २० नोव्हेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३४० | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

थोडक्यात

एएसपीसह ६ पोलिस निलंबित

सिवनी : मोबाईल फोन अनलॉक करण्यास नकार दिल्याने एका जोडप्याला खोट्या ड्रग्ज प्रकरणात अडकवण्याची धमकी दिल्याचा व्हीडीओ समोर आल्यानंतर मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणी अतिरिक्त पोलिस अधीक्षकांसह ६ पोलिस अधिका-यांना निलंबित करण्यात आले आहे. या घटनेची निष्पक्ष आणि सखोल चौकशी करण्याचे आदेशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.
मध्य प्रदेशातील सिवनी जिल्ह्यातील एका हॉटेलमध्ये पोलिसांनी छापा टाकला होता. यावेळी एका खोलीत जोडपे वास्तव्यास असल्याचे आढळले. त्यानंतर पोलिसांनी त्यांची चौकशी सुरू केली. या घटनेशी संबंधित एक व्हीडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. मात्र, या व्हीडीओची सत्यता स्वतंत्रपणे पडताळता आलेली नाही. व्हायरल व्हीडीओमध्ये अतिरिक्त पोलीस अधीक्षक दीपक मिश्रा हे जोडप्याची चौकशी करताना आणि त्यांच्या आई-वडिलांना फोन करण्यास सांगताना दिसत असल्याचा दावा केला जात आहे.

वर्षा तुरकर हत्येचा पर्दाफाश

पतीच्या मैत्रिणीचा काटा काढण्यासाठी पत्नीनेच दिली १३ लाख रुपयांची खुनाची सुपारी!

बोंडराणी जंगलातील वर्षा तुरकर हत्येचा स्थानिक गुन्हे शाखेने केला पर्दाफाश; पत्नी, सुपारी देणारा मध्यस्थ आणि दोन आरोपींसह चौघांना अटक



दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया

पतीचे दुसऱ्या महिलेसोबत प्रेमसंबंध असल्याच्या संशयातून संतप्त झालेल्या पत्नीने पतीच्या मैत्रिणीची हत्या करण्यासाठी तब्बल १३ लाख रुपयांची सुपारी दिल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. गोंदिया जिल्ह्यातील दवनीवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजा बोंडराणी येथील जंगल परिसरात घडलेल्या वर्षा तुरकर हत्याकांडाचा स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या काही दिवसांत छडा लावला आहे. या प्रकरणात मृत महिलेच्या हत्येचा कट रचणाऱ्या पतीच्या पत्नीला तसेच कटात सहभागी असलेल्या इतर आरोपींना पोलिसांनी अटक केली असून, आणखी दोन आरोपी फरार आहेत.

दिवाळीच्या सुट्टीत माहेरी आलेल्या वर्षा तुरकर यांची निर्घृण हत्या

पोलीस विभागाकडून प्राप्त माहितीनुसार, मृत वर्षा धुरनलाल तुरकर (वय ३५, रा. धानोरे, जिल्हा पुणे) या दिवाळीच्या सुट्टीत आपल्या माहेरी मौजा किन्ही, तालुका खैरलांजी, जिल्हा बालाघाट येथे आल्या होत्या. १४ नोव्हेंबर २०२६ रोजी त्या गोंदिया येथील आपले मित्र नितेश अग्रवाल यांच्यासोबत तिरोडा येथे गेल्या होत्या. तेथून परत येत असताना मौजा बोंडराणी येथील शिवमंदिराजवळील जंगल परिसरात काही वेळ थांबल्या होत्या.
दरम्यान, सायंकाळी ५.३० ते ६ वाजताच्या सुमारास अज्ञात तीन इसमांनी वर्षा तुरकर यांच्या पोटावर व पाठीवर चाकूने वार करून त्यांची निर्घृण हत्या केली. या घटनेनंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. याप्रकरणी मृत महिलेची हत्या झाल्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर दवनीवाडा पोलीस ठाण्यात १५ नोव्हेंबर २०२६ रोजी अपराध क्रमांक ५५०/२०२६, कलम १०३(१) भारतीय न्याय संहिता अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

२०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या तपासातून मिळाला महत्त्वाचा धागा

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला या हत्याकांडाचा तातडीने उलगडा करून आरोपींचा शोध घेण्याचे निर्देश दिले. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रेवचंद सिंगनजुडे यांनी अधिकारी व अंमलदारांचे स्वतंत्र पथक तयार करून तपासाला सुरुवात केली.
तपासादरम्यान पोलिसांनी तिरोडा, तिरोडा ते खैरलांजी, खैरलांजी ते बाराशिवनी, बाराशिवनी ते बालाघाट आणि बालाघाट ते गोंदिया या मार्गावरील जवळपास २०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे सात दिवसांतील चित्रीकरण तपासले.
या तपासात तीन संशयित इसम मोटारसायकलवरून मृत वर्षा तुरकर व त्यांचे मित्र नितेश अग्रवाल यांच्या वाहनाचा पाठलाग करत असल्याचे निदर्शनास आले. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी संशयितांची ओळख पटविण्यास सुरुवात केली.

पतीच्या प्रेमसंबंधातून पत्नीने रचला हत्येचा कट

तपासादरम्यान पोलिसांना या हत्याकांडामागील धक्कादायक कारण समोर आले. नितेश अग्रवाल यांचे मृत वर्षा तुरकर यांच्यासोबत प्रेमसंबंध असल्यामुळे त्यांची पत्नी सौ. मीना नितेश अग्रवाल (वय ४१, रा. साई मंगलम लॉनसमोर, गोविंदपूर रोड, गोंदिया) ही या संबंधांमुळे त्रस्त होती. याच कारणातून तिने घराजवळ राहणाऱ्या कुणाल कुंभलकर याच्या मदतीने वर्षा तुरकर यांची हत्या करण्याचा कट रचल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले. कुणाल कुंभलकर याने कुख्यात गुन्हेगार शाहरुख खान पठाण याच्याशी संपर्क साधून वर्षा तुरकर यांना ठार मारण्यासाठी १३ लाख रुपयांची सुपारी दिल्याचे पोलीस तपासात समोर आले. या कटानुसार इरमान करीम शेख (वय २६), रा. संजयनगर, मुर्गी, गोंदिया.२. शाहरुख खान फिरोज खान पठाण (वय ३३), रा. सिंधी कॉलनी, गोंदिया.३. कुणाल श्यामलाल कुंभलकर (वय ३१), रा. साई मंदिराजवळ, सिव्हिल लाईन्स, गोंदिया.४. सौ. मीना नितेश अग्रवाल (वय ४१), रा. साई मंगलम लॉनसमोर, गोविंदपूर रोड, गोंदिया या चारही आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, पुढील तपासासाठी त्यांना दवनीवाडा पोलीस ठाण्याच्या स्वाधीन करण्यात आले आहे. या गुन्ह्यातील इतर दोन आरोपी अद्याप फरार असून, त्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न सुरू आहेत.

भारतीयांसाठी मलेशियाचा व्हिसामुक्त प्रवास बंद होणार

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

भारतीय पर्यटकांसाठी मलेशियाने सुरू केलेली व्हिसामुक्त प्रवेशाची सुविधा १ जानेवारी २०२७ पासून बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानंतर मलेशियाला जाणाऱ्या भारतीय नागरिकांना प्रवासापूर्वी वैध व्हिसा घेणे बंधनकारक असेल. मलेशियाच्या इमिग्रेशन विभागाने १७ नोव्हेंबर २०२६ रोजी याबाबत घोषणा केली. कोरोना महामारीनंतर पर्यटनाला चालना देण्यासाठी मलेशियाने डिसेंबर २०२३ मध्ये भारतीय नागरिकांना ३० दिवसांच्या व्हिसामुक्त प्रवेशाची सुविधा सुरू केली होती. या सुविधेमुळे मलेशियाला जाणाऱ्या भारतीय पर्यटकांच्या संख्येत मोठी वाढ झाली. मात्र, या सुविधेचा वापर करून काही भारतीय नागरिक पर्यटनाऐवजी नोकरीच्या शोधात मलेशियात येत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे मलेशियाने ही सुविधा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.
मलेशियाच्या इमिग्रेशन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, १ जानेवारी २०२७ पासून भारतीय नागरिकांना व्हिसामुक्त प्रवेश मिळणार नाही. या तारखेपासून मलेशियात प्रवेश करण्यासाठी आधीच वैध व्हिसा घेणे आवश्यक असेल. व्हिसासाठी १ डिसेंबर २०२६ पासून माय व्हिसा पोर्टलवर अर्ज करता येणार आहे. बांगलादेश, भूतान, पाकिस्तान, श्रीलंका आणि नेपाळ या देशांतील नागरिकांनाही मलेशियात जाण्यासाठी व्हिसा आवश्यक आहे. क्वालालंपूर येथील भारतीय उच्चायुक्तालयाने काही दिवसांपूर्वी मलेशियातील व्हिसामुक्त प्रवेश सुविधेचा गैरवापर होत असल्याबाबत इशारा दिला होता. ३० दिवसांच्या व्हिसामुक्त सुविधेचा वापर करून काही भारतीय नागरिक मलेशियात नोकरी शोधण्यासाठी तिचा वापर करणे हा मलेशियाच्या स्थलांतर नियमांचा भंग असल्याचेही स्पष्ट करण्यात आले होते. भारतीय उच्चायुक्तालयाने सोशल मीडियावर याबाबत पोस्ट केली होती. काही भारतीय नागरिकांना एजंटांकडून नोकरीची खोटी आश्वासने दिली जात आहेत. अशा प्रकारे मलेशियात पोहोचलेल्या नागरिकांना व्हिसाची मुदत संपल्यानंतरही तिथे राहावे लागते. त्यामुळे त्यांना बेकायदेशीर स्थलांतरित ठरवले जाणे, शोषण, अटक आणि कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागण्याचा धोका असल्याचे उच्चायुक्तालयाने सांगितले होते. मलेशियात पर्यटनासाठी जाणाऱ्या भारतीय नागरिकांनी प्रवासापूर्वी परतीचे तिकीट, हॉटेलचे आरक्षण आणि इतर आवश्यक कागदपत्रे सोबत ठेवावीत, असे आवाहनही करण्यात आले होते. तसेच प्रवासाच्या तारखेच्या ३ दिवस आधी मलेशिया डिजिटल अरायव्हल कार्ड ऑनलाइन भरावे आणि पासपोर्टची वैधता किमान ६ महिने असावी, असेही उच्चायुक्तालयाने स्पष्ट केले होते.

गुजरातमधून महाराष्ट्रात नॉन-स्टँडर्ड वजनकाट्यांचा सुळसुळाट!

महाराष्ट्राच्या महसुलाला फटका, ग्राहकांच्या हिताशी खेळ; वैध मापनशास्त्र विभागाच्या नियंत्रणावर गंभीर प्रश्नचिन्ह!

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

गुजरात राज्यातून मोठ्या प्रमाणावर नॉन-स्टँडर्ड, नियमबाह्य आणि मॉडेल अप्रूव्हल नसलेले इलेक्ट्रॉनिक वजनकाटे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये विक्रीसाठी आणले जात असल्याचा गंभीर प्रकार समोर येत आहे. या प्रकारामुळे महाराष्ट्र शासनाच्या महसुलाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असून, ग्राहकांची फसवणूक होण्याची शक्यता वाढली आहे. विशेष म्हणजे, राज्यातील वैध मापनशास्त्र विभागाच्या नियंत्रणाखाली हा प्रकार सुरू असतानाही अशा बेकायदेशीर व्यवहारांवर प्रभावी कारवाई होत नसल्याने विभागाच्या कार्यक्षमतेवर अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.
मिळालेल्या माहितीनुसार, गुजरातमधील लक्ष्मी स्टील इंडस्ट्रीस, धवल पांचाळ अहमदाबाद, तसेच सावरकुंडला, यांच्याकडे वैध उत्पादनाचा परवाना नसताना तसेच काही उत्पादक व व्यापारी कोणत्याही अधिकृत मॉडेल अप्रूव्हलशिवाय विविध नावांनी वजनकाटे तयार करून महाराष्ट्रात जसे की, नागपूर, तुमसर, ब्रम्हपुरी, गोंदिया येथे विविध नावाने काटे पुरवठा करीत असल्याचा आरोप आहे. तसे २०० काटे विभागाकडून जप्ती सुद्धा करण्यात आलेले आहेत त्यात यांच्या विरुद्ध ब्रम्हपुरी येथे पुराव्यानिशी तक्रार करण्यात आली होती, त्यात आरोपीवर गुन्हा सुद्धा दाखल करण्यात आला, आणि माननीय निर्यात्रक वैध मापन शास्त्र अहमदाबाद यांना महाराष्ट्र वैधमापन शास्त्र विभागाने पत्राद्वारे हा सर्व गैरप्रकार झालेला कळविण्यात आला होता. हे वजनकाटे महाराष्ट्रातील परवानाधारक तसेच विनापरवाना विक्रेत्यांकडून मागविले जात असल्याचे निदर्शनास येत आहे. या व्यवहारांमध्ये काही ठिकाणी नियमबाह्य पद्धतीने सील, स्टॅम्पिंग प्लेट आणि प्रमाणपत्रांचाही वापर केला जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

गुजरातमधील कमी शुल्काचा फायदा की नियमांना हरताळ?

महाराष्ट्र राज्याच्या तुलनेत गुजरातमध्ये वजनकाट्यांच्या पडताळणी व मुद्रांकनासाठी आकारले जाणारे शुल्क कमी असल्याचा फायदा घेत काही व्यापारी गुजरातमधून सील, स्टॅम्पिंग प्लेट आणि प्रमाणपत्रे मागवून महाराष्ट्रात वजनकाट्यांची विक्री करीत असल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे, तुटलेल्या सील तारांसह किंवा आवश्यक सुरक्षा प्रक्रियेचे पालन न करता वजनकाटे बाजारात विक्रीस उपलब्ध करून दिले जात असल्याची तक्रार आहे.
गुजरातमधील काही वैध मापनशास्त्र अधिकारी व निरीक्षकांकडून प्रत्येक वजनकाट्यामागे ५० ते १०० रुपये घेऊन अशा नियमबाह्य व्यवहारांना मदत केली जात असल्याचा कथित गंभीर आरोप संघटनेच्या वतीने करण्यात येत आहे. या आरोपांची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. संबंधित अधिका?यांची भूमिका तपासल्यास या संपूर्ण साखळीमागील सत्य समोर येऊ शकते.

वजनकाट्यांमध्ये रिमोट व कॅलिब्रेशन बदलण्याची सुविधा?

या नॉन-स्टँडर्ड वजनकाट्यांबाबत सर्वांत गंभीर बाब म्हणजे काही वजनकाट्यांमध्ये झिरो टेअर बटणाव्यतिरिक्त इतर सेटिंग्ज व कॅलिब्रेशनमध्ये बदल करण्याच्या सुविधा उपलब्ध असल्याचा आरोप आहे. अशा प्रकारच्या सुविधांचा गैरवापर करून वजनात फेरफार करण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशी बेकायदेशीर वजन काटे महाराष्टभर पसरलेली आहेत.
वजनकाट्यांच्या माध्यमातून शेतकरी, व्यापारी, ग्राहक आणि सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक नुकसान होऊ शकते. विशेषतः कृषी उत्पन्न बाजार समिती, धान्य बाजारपेठा, किराणा दुकाने, स्वस्त धान्य दुकान, लोहा विक्रेते आणि इतर व्यावसायिक व्यवहारांमध्ये अचूक वजनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे अशा उपकरणांची तांत्रिक तपासणी आणि कायदेशीर पडताळणी करणे अत्यंत आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील स्थानिक उत्पादकांवर अन्याय

महाराष्ट्रातील अधिकृत परवानाधारक व मान्यताप्राप्त उत्पादक शासनाचे नियम, मॉडेल अप्रूव्हल, गुणवत्ता निकष आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून वजनकाट्यांची निर्मिती करतात. मात्र दुसरीकडे गुजरातमधून स्वस्त दरात नियमबाह्य वजनकाटे आणून बाजारपेठेत विक्री होत असल्यास अधिकृत उत्पादकांसमोर मोठे आर्थिक संकट निर्माण होणे स्वाभाविक आहे.
नियमांचे पालन करणाऱ्या उत्पादकांना शासनाच्या विविध अटी व शुल्कांचा सामना करावा लागतो, तर नियमबाह्य व्यवहार करणाऱ्यांना कोणतीही भीती नसल्याचे चित्र निर्माण होत आहे. परिणामी प्रामाणिक उत्पादकांचा व्यवसाय धोक्यात येत असून, शासनाच्या महसुलालाही फटका बसत आहे.

नागपूर जिल्ह्यातील बाजारपेठांमध्ये सर्रास विक्रीचा आरोप

नागपूर जिल्ह्यातील परिस्थिती अधिक चिंताजनक असल्याचा दावा संघटनेने केला आहे. प्रत्येक दहा विक्रेत्यांपैकी जवळपास आठ विक्रेते गुजरातमधून नॉन-स्टँडर्ड वजनकाटे मागवून विक्री करीत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या वजनकाट्यांना कोणतेही स्टिकर किंवा वेगवेगळ्या ब्रँडची नावे लावून बाजारात विक्री केली जात असल्याचेही सांगण्यात येत आहे.
नागपूर विभागात, आणि संपूर्ण महाराष्ट्र राज्यात, शहरातील इतवारी, नमकगंज, लोह ओली, धारस्कर रोड, चुनावली, कळमना, महाल आणि हिंगणा या व्यापारी परिसरांमध्ये अशा प्रकारच्या वजनकाट्यांची विक्री होत असल्याची तक्रार संघटनेने केली आहे. या सर्व ठिकाणांची अचानक तपासणी करून प्रत्यक्ष परिस्थितीची पडताळणी करण्याची मागणी करण्यात येत आहे.

ब्रह्मपुरीतील कारवाईनंतरही राज्यभर नियंत्रण का नाही?

चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी येथे आशिष पारधी व सूरज पारधी यांच्याशी संबंधित सर्विसेस आणि साई इलेक्ट्रॉनिक्स या व्यावसायिक आस्थापनांवर नियमबाह्य वजनकाट्यांच्या प्रकरणात कारवाई झाल्याची माहिती समोर आली आहे. संबंधित प्रकरणात फौजदारी गुन्हाही दाखल झाल्याचे सांगण्यात येत आहे.
जर अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये कारवाई शक्य असेल, तर नागपूरसह महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्ये अशा प्रकारच्या विक्रीवर व्यापक कारवाई का होत नाही? संबंधित निरीक्षकांना या व्यवहारांची माहिती नाही का? की माहिती असूनही दुर्लक्ष केले जात आहे? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

वैध मापनशास्त्र विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह

वैध मापनशास्त्र विभागाची मूलभूत जबाबदारी म्हणजे ग्राहकांचे हित जपणे, वजनमापातील अचूकता सुनिश्चित करणे, नियमबाह्य उपकरणांना प्रतिबंध करणे आणि कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करणे. मात्र बाजारपेठेत नियमबाह्य वजनकाट्यांचा पुरवठा आणि विक्री वाढत असल्याच्या तक्रारी येत असतील, तर संबंधित विभागाच्या निरीक्षण व नियंत्रण यंत्रणेची कार्यक्षमता तपासण्याची वेळ आली आहे.
काही अधिकारी आणि निरीक्षक आर्थिक देवाणघेवाण करून अशा प्रकारांकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोपही संघटनेने केला आहे. या आरोपांची वरिष्ठ स्तरावर चौकशी करून दोषी आढळणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

संघटनेच्या शासनाकडे प्रमुख मागण्या

महाराष्ट्रातील वैध मापनशास्त्र परवानाधारकांच्या संघटनेच्या वतीने शासन आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पुढील मागण्या करण्यात येत आहेत.
१. गुजरातमधून महाराष्ट्रात येणाऱ्या सर्व वजनकाट्यांच्या पुरवठा साखळीची सखोल चौकशी करण्यात यावी.
२. मॉडेल अप्रूव्हल नसलेले व नियमबाह्य वजनकाटे तयार करणारे उत्पादक, पुरवठादार आणि विक्रेते यांच्यावर तातडीने कारवाई करावी.
३. नागपूर शहरातील इतवारी, नमकगंज, लोहा ओली, धारस्कर रोड, चुनावली, कळमना, महाल व हिंगणा येथील वजनकाटा विक्रेत्यांची विशेष तपासणी मोहीम राबवावी.
४. परवानाधारक व विनापरवाना अशा दोन्ही प्रकारच्या विक्रेत्यांच्या व्यवहारांची आणि खरेदी-विक्रीच्या नोंदींची तपासणी करावी.
५. नियमबाह्य वजनकाटे विक्रीसाठी जबाबदार असलेल्या व्यक्तींचे परवाने कायद्यानुसार निलंबित किंवा रद्द करण्याची कार्यवाही करावी.
६. बनावट किंवा अनधिकृत सील, स्टॅम्पिंग प्लेट व प्रमाणपत्रांचा वापर करणाऱ्यांवर फौजदारी कारवाई करावी.
७. गुजरातमधील पुरवठादारांकडून आलेले वजन काटे, तत्काळ जप्ती करावी.
८. महाराष्ट्रातील अधिकृत उत्पादक आणि परवानाधारक विक्रेत्यांना न्याय मिळावा यासाठी नियमबाह्य आयात व विक्रीवर नियंत्रण आणावे.
९. संपूर्ण महाराष्ट्रात विशेष तपासणी पथके तयार करून जिल्हानिहाय कारवाई करण्यात यावी.
१०. दोषी अधिकारी, कर्मचारी, उत्पादक, पुरवठादार आणि विक्रेत्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करून त्याचा अहवाल सार्वजनिक करावा.

'पैसा फेको आणि तमाशा पाहा' अशी परिस्थिती निर्माण होऊ नये!

आज वजनमापाच्या क्षेत्रात नियमांचे पालन करणाऱ्या व्यक्तींना अडचणींचा सामना करावा लागत असताना नियमबाह्य व्यवसाय करणाऱ्यांना मोकळे रान मिळत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. त्यामुळे ग्राहकांचे हित कोण जपणार, शासनाचा महसूल कोण वाचवणार आणि कायद्याची अंमलबजावणी कोण करणार, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. रक्षकच भक्षक झाले तर सामान्य ग्राहकांनी न्याय मागायचा तरी कोणाकडे? हा प्रश्न आता केवळ वजनकाटा उत्पादक किंवा परवानाधारक विक्रेत्यांचा राहिलेला नसून, संपूर्ण महाराष्ट्रातील ग्राहकांच्या विश्वासाशी संबंधित झाला आहे.
गुजरातमून महाराष्ट्रात येणाऱ्या नियमबाह्य वजनकाट्यांच्या पुरवठ्यावर आळा घालण्यासाठी शासन नेमकी कोणती पावले उचलणार? दोषी अधिकारी आणि विक्रेत्यांवर कारवाई कधी होणार? महाराष्ट्राचा महसूल वाचविण्यासाठी आणि ग्राहकांचे हित सुरक्षित ठेवण्यासाठी प्रशासन कधी जागे होणार? या प्रश्नांची उत्तरे आता जनतेला अपेक्षित आहेत. महाराष्ट्र शासनाने या गंभीर विषयाची तातडीने दखल घेऊन राज्यव्यापी तपासणी मोहीम राबवावी आणि दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, हीच वैध मापनशास्त्र क्षेत्रातील संघटनेची ठाम मागणी आहे.

संपादकीय लेखणीतून...

बाबदिन : उचित कार्याची प्रेरणात्मक शिकवण

जागतिक बालदिन २० नोव्हेंबर रोजी साजरा केला जातो. या दिवसाचे उद्दिष्ट म्हणजे बालकांच्या हक्कांचे रक्षण करणे, त्यांच्या गरजांकडे लक्ष देणे आणि एक समृद्ध, सुरक्षित भविष्य निर्माण करणे होय. सन १९५४ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने हा दिवस बालकांच्या आरोग्य, शिक्षण, संरक्षण आणि विकास यांसारख्या मूलभूत गरजांवर जागरूकता वाढवण्यासाठी सुरू केला. जागतिक बालदिनानिमित्त शाळा, समाजसेवी संस्था आणि विविध सामाजिक संघटना मुलांच्या कल्याणासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करतात, जसे की सांस्कृतिक कार्यक्रम, खेळ, चर्चासत्रे आणि बालहक्कांविषयी माहितीपट. बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना सुरक्षित, सन्मानपूर्वक आणि समर्थ वातावरण देणे आवश्यक आहे. बालक हे समाजाचे भविष्य आहेत; त्यांच्या हक्कांचे रक्षण करून, त्यांना शिक्षण आणि आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्यास एक सशक्त समाज निर्माण होऊ शकतो. जागतिक बालदिन आपल्याला मुलांचे आरोग्य, शिक्षण आणि त्यांच्या हक्कांचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी एक संधी प्रदान करतो.

सन १९५४ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघ आणि युनिसेफ यांनी २० नोव्हेंबर हा दिवस "सर्वत्रिक दिन" म्हणून पाळण्याची शिफारस केली. दि. २० नोव्हेंबर १९५९ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाने "बालहक्कांची सनद" मान्य केली आणि दि. २० नोव्हेंबर १९८९ रोजी "बालहक्क करार" संमत केला. जगभरातील मुलांचे अधिकार जपणे, त्यांचे शोषण थांबवणे, त्यांना दर्जेदार शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षित वातावरण मिळवून देणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. भारतात जागतिक पातळीच्या ऐवजी दरवर्षी १४ नोव्हेंबर रोजी बालदिन साजरा केला जातो. पंडित जवाहरलाल नेहरूजींचा जन्मदिवस हा दिवस भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूजी यांच्या जन्मस्मरणार्थ साजरा केला जातो. त्यांना लहान मुलांविषयी अपार प्रेम होते, मुले त्यांना प्रेमाने "चाचा नेहरू" म्हणत. सन १९६४ मध्ये त्यांच्या निधनानंतर हा दिवस भारतात बालदिन म्हणून ठरवण्यात आला. जगात वेगवेगळ्या देशांमध्ये वेगवेगळ्या दिवशी बालदिन साजरा केला जातो. चीनः ४ एप्रिल, जपानः ५ मे, अमेरिकाः जून महिन्याचा दुसरा रविवार, पाकिस्तानः १ जुलै, ब्रीटन (युके): ३० ऑगस्ट, अनेक कम्युनिस्ट देशः १ जून. बालकांच्या गरजा व हक्क यांविषयी जाणीवजागृती करणे. बालकल्याणकारी योजना वाढीस लावणे. बालकांमध्ये सांप्रदायिक व सांस्कृतिक देवाणघेवाण करणे. बालकांमध्ये विविध पंथ वा धर्मांबाबत सहिष्णुता निर्माण करून सामंजस्याची भावना वाढीस लावणे. जगभरातील मुलामुलींमध्ये बंधुभाव वाढीस लावणे. बालकांचे बालपण अधिक समृद्ध बनवणे. बालकांमध्ये 'विश्वकुटुंब" संकल्पना वाढीस लावणे. बालदिन वैशिष्ट्यः बालदिनानिमित्त विभूतिपूजा टाळून बालकांच्या गरजा व हक्क यांबाबत राष्ट्रातील पालकांमध्ये जाणीवजागृती निर्माण केली जाते. पंडित नेहरूजी यांचा धीरोदात्तपणा, वीरवृत्ती, असामान्य चरित्र व चारित्र्य तसेच अथांग मानवता हे बालकांमध्ये संक्रमित करण्याचा प्रयत्न केला जातो. कविवर्य रवींद्रनाथ टागोरजी यांनी म्हटल्याप्रमाणे 'जवाहरलाल म्हणजे ऋतुराज'. हा 'ऋतुराज' मुलामुलींमध्ये खुलवून त्यांचे जीवन आनंदी बनविण्याचा प्रयत्न केला जातो. मुलांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होण्यासाठी अशा दीपस्तंभाची गरज असते. ती भागविण्याचा येथे अल्पसा प्रयत्न सुरू आहे; परंतु आज शिक्षणपद्धतीकडे नेहरूजींच्या दृष्टीने पाहिले जात नाही. त्यामुळे नको त्या वयात नको ते गुन्हे बालकांकडून घडत आहेत. त्यांची मने 'कोडगी' बनल्यामुळे भावनिक बुद्धिमत्ता कमी झाली आहे, याची पालकांना जाणीव राहिलेली नाही. बालगुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. याचे कारण आपण संस्काराला कमी पडत आहोत. इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे वाढते प्रमाण, प्रादेशिक भाषेतील शाळांमधील घटती विद्यार्थिसंख्या.

व्यापारी दृष्टिकोनातून शाळा काढून संस्थाचालक संस्थानिक झाले आहेत. शिक्षकप्रशिक्षणाचा कणाच मोडला आहे. पूर्व माध्यमिक शिक्षणाकडे अक्षम्य दुर्लक्ष झाल्यामुळे आज भ्रष्टाचार वाढला आहे. त्यासाठी चांगल्या चारित्र्याचे शिक्षक, पालक, संस्थाचालक, राज्यकर्ते इत्यादींची गरज आहे. त्यांची निर्मिती बालशिक्षणातून केली पाहिजे. केवळ "बालआनंद मेळावा, बालमहोत्सव, बालदिन" यांसारख्या दिवशी मनोरंजनात्मक कार्यक्रम साजरे न करता, त्यांतून मुलामुलींमध्ये कुटुंब, समाज, देश इत्यादींबद्दल आपुलकीची भावना निर्माण झाली पाहिजे आणि त्यांप्रती उचित कार्य करण्याची प्रेरणात्मक शिकवण दिली पाहिजे.

भारत आणि आसियान धोरणात्मक भागीदारी

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

भारत आणि आग्नेय आशियाई देशांची संघटना म्हणजेच आसियान यांच्यातील संबंध ऐतिहासिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या अत्यंत दृढ आहेत. भारताच्या पराष्ट्र धोरणात या देशांना अनन्यसाधारण महत्त्व असून, 'ॲक्ट ईस्ट' या धोरणांतर्गत भारताने या प्रदेशासोबतचे आपले संबंध गेल्या काही वर्षांत अधिक व्यापक आणि प्रगल्भ केले आहेत. याच धोरणाचा आणि वाढत्या सहकार्याचा परिपाक म्हणून १७ नोव्हेंबर २०२६ रोजी मनिला, फिलिपाईन्स येथे पार पडलेली २३ वी भारत-आसियान शिखर परिषद जागतिक राजकारणाच्या आणि अर्थकारणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरली.

या ऐतिहासिक परिषदेचे यजमानपद फिलिपाईन्सचे राष्ट्राध्यक्ष फर्डिनांड मार्कोस ज्युनियर यांनी भूषवले होते. या परिषदेत भारताचे प्रतिनिधित्व करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताचा विकास आणि सुरक्षा या दोन्ही संकल्पना एकमेकांना पूरक असल्याचे पंतप्रधानांनी आवर्जून स्पष्ट केले. भारताची 'ॲक्ट ईस्ट' नीती आता अधिक गतिमान झाली असून, आगामी २०२७ या वर्षात भारत आणि आसियान देशांच्या राजनैतिक संबंधांना तब्बल ३५ वर्षे पूर्ण होत आहेत. त्याचबरोबर त्यांच्यातील सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारीला देखील पाच वर्षे पूर्ण होणार आहेत. या पार्श्वभूमीवर, दोन्ही बाजूंचे संबंध केवळ आर्थिक किंवा व्यापारी न राहता ते अधिक धोरणात्मक आणि बहुआयामी कसे बनतील, यावर या परिषदेत विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले.

भारत आणि आसियान यांच्यातील ही सर्वसमावेशक भागीदारी अधिक बळकट करण्यासाठी आणि भविष्यातील जागतिक आव्हानांचा एकत्रित मुकाबला करण्यासाठी पंतप्रधान मोदी यांनी तब्बल नऊ प्रमुख उपक्रम आणि धोरणात्मक योजना प्रस्तावित केल्या. या नऊ उपक्रमांमध्ये प्रामुख्याने पर्यटन, सागरी सुरक्षा, युवा विकास, तंत्रज्ञान आणि ऊर्जा यांसारख्या अत्यंत कळीच्या क्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे. पर्यटन क्षेत्राला नवी संजीवनी देण्यासाठी आणि लोकांमधील संपर्क वाढवण्यासाठी आसियान देशांतील पर्यटकांना मोफत ई-व्हिसा सुविधा देण्याची महत्त्वपूर्ण घोषणा भारताने केली आहे. याव्यतिरिक्त, सागरी सुरक्षा आणि कनेक्टिव्हिटी वाढवण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन, तटरक्षक दलांचे सहकार्य वाढवण आधारित एक दीर्घकालीन सागरी सहकार्य आराखडा मांडण्यात आला आहे.

युवा पिढीला परस्परांशी जोडण्यासाठी 'युथ कनेक्ट' या संकल्पनेअंतर्गत युवा संसद सदस्यांची देवाणघेवाण, युथ समिट आणि स्टार्ट-अप हॅकेथॉनसारखे नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जाणार आहेत. तसेच, शिक्षण क्षेत्रातील सहकार्य वाढवण्यासाठी ऐतिहासिक नालंदा विद्यापीठात आसियान देशांतील विद्यार्थ्यांसाठी दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीच्या संख्येतही वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

आधुनिक काळातील सायबर सुरक्षेचे मोठे आव्हान ओळखून प्रादेशिक क्षमता वाढवण्यासाठी संयुक्त सायबर फॉरेन्सिक्स प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्याचा प्रस्ताव या परिषदेत मांडण्यात आला. वासोबतच, तंत्रज्ञान आणि अंतराळ क्षेत्रात एकत्रित काम करण्यासाठी 'स्पेस हॅकेथॉन'चे आयोजन, तसेच अणुऊर्जेच्या शांततापूर्ण आणि तांत्रिक वापरासाठी परस्पर सहकार्य वाढवण्यावर दोन्ही बाजूंचे एकमत झाले. खाणकाम आणि महत्त्वपूर्ण खनिजांच्या क्षेत्रातही एकत्रित काम करण्याची भारताची तयारी या नऊ कलमी कार्यक्रमाचा एक अतिशय महत्त्वाचा भाग आहे. कला आणि संस्कृतीला चालना देण्यासाठी २०२७ मध्ये होणाऱ्या वेव्हज महोत्सवात क्रिएटिव्ह पार्टनरशिप पॅव्हेलियनची स्थापना करण्याचेही प्रस्ताविक करण्यात आले.

परिषदेच्या अखेरीस सर्व सदस्य देशांच्या नेत्यांनी आपत्ती व्यवस्थापनातील सहकार्यावरील संयुक्त निवेदनावर स्वाक्षऱ्या केल्या. एकंदरीतच, ही शिखर परिषद भारत आणि आसियान देशांमधील ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि धोरणात्मक संबंधांना एका नव्या उंचीवर नेणारी आणि आगामी काळातील जागतिक शांतता व विकासाचा भक्कम पाया रचणारी ठरली आहे.

एकंदरीत, भारत आणि आसियान देशांमधील धोरणात्मक भागीदारी ही केवळ आर्थिक किंवा व्यापारी संबंधांपुरती मर्यादित नसून ती सुरक्षा, तंत्रज्ञान, शिक्षण, संस्कृती आणि प्रादेशिक शांततेच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण आहे. परस्पर सहकार्य, विश्वास आणि सामूहिक विकासाच्या माध्यमातून भारत आणि आसियान देश इंडो-पॅसिफिक क्षेत्रात स्थैर्य व समृद्धीचे नवे पर्व निर्माण करू शकतात.

- ९५६१५९४३०६

कोच गंभीरच्या रणनीतीचा फज्जा!

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

५ बाद ७० वरून न्यूझीलंडची ५ बाद २४३ धावापर्यंत झेप

पहिल्या सत्रात भारताचे वर्चस्व; अखेरच्या दोन सत्रांत निकोल्स-फिलिप्सची बॅटिंग! सिराज-जडेजाला डावलण्याचा निर्णय भारताला महागात पडणार?

कसोटी क्रिकेटमध्ये एखाद्या संघाची ताकद केवळ त्याच्या सुरुवातीच्या कामगिरीवरून मोजता येत नाही. पाच दिवसांच्या संघर्षात परिस्थितीनुसार रणनीती बदलण्याची क्षमता, गोलंदाजांचा योग्य वापर, क्षेत्ररक्षणातील सतर्कता आणि प्रतिस्पर्ध्यांच्या डावपेचांना वेळीच उत्तर देण्याची बुद्धिमत्ता महत्त्वाची असते. वेलिंग्टनच्या बेसिन रिझर्व्ह मैदानावर भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पहिल्या कसोटीच्या पहिल्या दिवसाचा खेळ पाहिल्यानंतर गौतम गंभीर यांच्या प्रशिक्षकीय रणनीतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

भारताला या दौऱ्यातील कसोटी मालिकेत विजय मिळविणे आवश्यक असताना संघनिवडीपासून गोलंदाजांच्या वापरापर्यंत अनेक निर्णयांची परीक्षा लागणार आहे. विशेष म्हणजे, पहिल्या दिवसाच्या सकाळच्या सत्रात भारतीय संघाने अप्रतिम गोलंदाजी केली; परंतु त्यानंतरच्या दोन सत्रांत सामन्यावरील पकड पूर्णपणे सैलावली. दिवसअखेर न्यूझीलंडने ८१ षटकांत ५ बाद २४३ धावा केल्या. सकाळी ५ बाद ७० अशी अवस्था असलेल्या न्यूझीलंडला एक बळी मिळवून चांगली साथ दिली. मात्र, बुमराहचा प्रभाव संपल्यानंतर इतर गोलंदाजांना त्याच दर्जाचा दबाव निर्माण करता आला नाही. प्रसिद्ध कृष्णाला अपेक्षित टप्पा आणि दिशा सापडली नाही. त्याने आठ षटकांत ३५ धावा दिल्या; मात्र एकही बळी मिळवता आला नाही. बुमराहच्या अनुपस्थितीत प्रतिस्पर्ध्यांना अडचणीत आणणारा दुसरा गोलंदाज भारताकडे दिसला नाही. याच ठिकाणी सिराजच्या अनुभवाची आणि आक्रमकतेची उणीव जाणवली.

जडेजाला वगळण्याची किंमत मोजावी लागणार?

रवींद्र जडेजाला बाहेर ठेवून वॉशिंग्टन सुंदरला संधी देण्यात आली. सुंदर हा गुणवत्तापूर्ण अष्टपैलू खेळाडू असला तरी जडेजाचा अनुभव, गोलंदाजीतील विविधता, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षण यांची सरासरी भरपाई करणे सोपे नाही.

न्यूझीलंडच्या फलंदाजीतील डावखुऱ्या फलंदाजांची संख्या लक्षात घेता जडेजाची फिरकी उपयुक्त ठरली असती. विशेषतः मधल्या षटकांत धावगती रोखणे आणि फलंदाजांना चुका करण्यास भाग पाडणे, हे जडेजाचे बलस्थान आहे. मात्र, भारताने त्याला बाहेर ठेवण्याचा निर्णय घेतला.

पहिल्या दिवशी सुंदरला केवळ फारशी गोलंदाजी देण्यात आली नाही. यावरून त्याला गोलंदाजी करण्याची पुरेशी संधीच मिळाली नाही, हे स्पष्ट होते. अर्थात, खेळपट्टीवरील परिस्थिती आणि कर्णधाराचे नियोजन यांचाही विचार करावा लागतो. परंतु जडेजासारख्या अनुभवी अष्टपैलू खेळाडूला बाहेर ठेवण्यामागील रणनीती आता अधिकच चर्चेत आली आहे.

५ बाद ७० वरून २४३ धावा; भारतीय गोलंदाजीचा आलेख घसरला!

पहिल्या सत्रात भारतीय गोलंदाजांनी अपेक्षेप्रमाणे वर्चस्व गाजवले. टॉम लॅथम, डेव्हॉन कॉनवे, रचिन रवींद्र, डॅरिल मिचेल आणि टॉम ब्लंडेल हे पाच फलंदाज बाद झाल्यामुळे न्यूझीलंडची अवस्था बिकट झाली होती. बुमराहच्या भेदक गोलंदाजीसमोर यजमान संघ पूर्णपणे बचावात्मक झाला होता. दुपारच्या सत्रात मात्र हेन्री निकोल्स आणि ग्लेन फिलिप्स यांनी संयमाने फलंदाजी करत डाव सावरण्यास सुरुवात केली. निकोल्सने एका बाजूने बचावात्मक फलंदाजी केली, तर फिलिप्सने संधी मिळेल तेव्हा आक्रमक फटके मारत धावफलक हलता ठेवला.

चहापानापर्यंत न्यूझीलंडने ५ बाद १४० धावा केल्या होत्या. त्यानंतरच्या अखेरच्या सत्रात भारतीय गोलंदाजांना एकही बळी मिळवता आला नाही. निकोल्स आणि फिलिप्स यांनी भारतीय गोलंदाजांचा आत्मविश्वास खच्ची करत दिवसअखेरपर्यंत किल्ला लढवला.

निकोल्सने १२ वे कसोटी शतक झळकावत नाबाद ११३ धावा केल्या. त्याच्या खेळीत संयम, तंत्र आणि परिस्थितीचे भान यांचा सुंदर मिलाफ दिसून आला. दुसऱ्या बाजूला ग्लेन फिलिप्सने ९४ धावांची नाबाद खेळी केली. शतकापासून तो अवघ्या सहा धावा दूर राहिला. दोघांनी सहाव्या विकेटसाठी नाबाद १७३ धावांची भागीदारी केली. सकाळच्या सत्रात कोलमडलेली न्यूझीलंडची फलंदाजी या दोघांनी पुन्हा उभी केली.

क्षेत्ररक्षणातील एक चूकही भारताला भोवली!

निकोल्सने शतक पूर्ण केल्यानंतर प्रसिद्ध कृष्णाच्या गोलंदाजीवर त्याला बाद करण्याची संधी भारताला मिळाली होती. मात्र, झेल घेण्यासाठी धावलेल्या यष्टिरक्षक रिषभ पंत आणि देवदत्त पडिक्कल यांच्यात योग्य समन्वय न झाल्याने हा झेल सुटला. निकोल्स त्या वेळी शतकाच्या उंबरठ्यावर होता. अशा महत्त्वाच्या क्षणी मिळालेली संधी गमावणे भारताला महागात पडले. कसोटी क्रिकेटमध्ये प्रतिस्पर्ध्याला एक संधी दिली तरी तो सामन्याचे चित्र बदलू शकतो. निकोल्सने त्यानंतरही आपली एकाग्रता ढळू दिली नाही आणि शतक पूर्ण केले. फिलिप्सनेही त्याला उत्तम साथ दिली. भारतीय गोलंदाजांकडून वारंवार प्रयत्न झाले; परंतु या जोडीला फोडण्यात यश आले नाही.

गंभीर यांची रणनीती की अति-प्रयोगांचा अट्टहास?

गौतम गंभीरची प्रशिक्षक म्हणून कार्यपद्धती नेहमीच चर्चेचा विषय राहिली आहे. आक्रमक निर्णय घेणे, नव्या खेळाडूंना संधी देणे आणि संघरचनेत बदल करणे यात गैर काहीच नाही. मात्र, कोणताही प्रयोग करताना त्याचे संभाव्य परिणाम लक्षात घेणे आवश्यक असते. वेलिंग्टन कसोटीच्या पहिल्या दिवसाने एक गोष्ट स्पष्ट केली आहे. भारताने चार वेगवान गोलंदाज खेळवून सकाळच्या सत्रात अपेक्षित यश मिळवले; पण त्यानंतर गोलंदाजीतील विविधतेचा अभाव जाणवला. सिराजसारखा अनुभवी गोलंदाज आणि जडेजासारखा अष्टपैलू खेळाडू बाहेर असल्यामुळे संघाच्या संतुलनावर प्रश्न निर्माण झाले आहेत. पहिल्या सत्रातील यशामुळे संघव्यवस्थापनाला आपली निवड योग्य वाटली असेल; परंतु दिवसअखेरची परिस्थिती वेगळेच चित्र दाखवते. ५ बाद ७० वरून ५ बाद २४३ अशी मजल मारणे ही केवळ न्यूझीलंडच्या फलंदाजांची कामगिरी नाही, तर भारतीय गोलंदाजांनी निर्माण केलेली पकड कायम राखण्यात आलेले अपयशही आहे.

दुसऱ्या दिवशी भारतासमोर दुहेरी आव्हान!

दुसऱ्या दिवसाच्या सुरुवातीला भारताला नव्या चेंडूचा फायदा घेण्याची संधी असेल. फिलिप्सचे शतक रोखणे आणि निकोल्सला लवकर बाद करणे ही भारतीय गोलंदाजांची पहिली प्राथमिकता असली पाहिजे. न्यूझीलंडच्या तळाच्या फळीला मोठी भागीदारी करण्याची संधी दिल्यास पहिल्या डावात मोठी धावसंख्या उभी राहू शकते.

बुमराहने पहिल्या दिवशी ३१ धावांत तीन बळी मिळवून आपली गुणवत्ता पुन्हा सिद्ध केली. मात्र, कसोटी सामना एकट्या बुमराहच्या जोरावर जिंकता येत नाही. इतर गोलंदाजांनीही जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

- ९०९६३७२०८२

झाशीची राणी लक्ष्मीबाई; तळपत्या सुर्याचा तेजोमय प्रकाश

रमेश लांजेवार
नागपूर

आज इतिहासातच नाही तर जगात झाशीची राणी लक्ष्मीबाईचे नाव मोठ्या स्वाभिमानाने घेतल्या जाते. कारण कमी वयात देशासाठी लढा उभारून इंग्रजांशी दोन-दोन हात करून संघर्ष केला यात लक्ष्मीबाईची महानता अजरामर आहे. झाशीची राणी लक्ष्मीबाईचा जन्म मोरोपंत तांबे आणि भागीरथीबाई यांच्या पोटी उत्तर प्रदेशातील काशी (वाराणसी) येथे १९नोव्हेंबर १८३५ ला झाला. लक्ष्मीबाईचे मुळ नाव मणिकर्णिका होते. लक्ष्मीबाईचे वडील मोरोपंत तांबे हे पुण्याच्या पेशव्यांच्या आश्रयाला होते. मुळचे रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील गुढे गावचे होते. नंतर काशी येथे स्थायी झाले व तिथे लक्ष्मीबाईचा जन्म झाला. उत्तर भारतातील झाशी राज्यातील महाराज गंगाधरराव नेवलेकर यांच्याशी १९ में १८४२ ला विवाह झाला आणि लक्ष्मीबाई झाशीची राणी बनली.परंतु २१ नोव्हेंबर १८५३ रोजी महाराज गंगाधरराव नेवलेकर यांचे निधन झाले तेव्हा राणी अवघ्या १८ वर्षांच्या होत्या.तथापि राणीने आपला संयम आणि धैर्य राखले आणि बाळ दामोदरच्या लहान वयामुळे राणी लक्ष्मीबाईने राज्याचा ताबा घेतला. लक्ष्मीबाई एकोणिसाव्या शतकातील झाशी राज्याच्या महाराणी होत्या. १८५७ च्या ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी विरूध्द झालेल्या स्वातंत्र्य उठावातील एक अग्रगण्य तेजस्वी, महाप्रतापी आणि कमी वयातील बहादुर सेनानी होत्या. ७ मार्च १८५४ रोजी ब्रिटिश सरकारने झाशीला ब्रिटिश साम्राज्यात सामील होण्याचे आदेश देणारे अधिकृत राजपत्र जारी केले.ब्रिटीश अधिकारी एलिसचा हा आदेश राणी लक्ष्मीबाईने ऐकल्यावर ताळ पायाची आग मस्तकात गेली व आदेश पाळण्यास नकार दिला आणि "मी झाशी देणार नाही" असे जाहीर केले व झाशी हे बंडाचे केंद्र बनले.

सर ह्यु रोज यांनी २२ मे १८५८ रोजी काल्पीवर हल्ला केला.परंतु राणी लक्ष्मीबाईने आपल्या पराक्रमाने ब्रिटिशांना पराभूत केले. यामुळे ब्रिटिश तिलमीला झाले व पुन्हा काल्पीवर हल्ला केला आणि राणीचा पराभव झाला.या पराभवानंतर रावसाहेब पेशवे, बांद्याचे नवाब, तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाई आणि इतर



महत्वाचे सैनिक गोपाळपूरला जमले.यावेळी राणीने ग्वाल्हेर ताब्यात घेण्याचा सल्ला दिला. लक्ष्मीबाई आणि तात्या टोपे यांनी बंडखोर सैन्यासह ग्वाल्हेरवर कूच केले व ग्वाल्हेरचा किल्ला काबीज केला आणि ग्वाल्हेरचे राज्य पेशव्यांच्या ताब्यात दिले. १८५७ चा उठाव हा संपूर्ण हिंदुस्थानात झाला. त्याचप्रमाणे ५ जून १८५७ ला झाशीतही शिपायांचा उद्रेक झाला व केवळ ३५ शिपायांनी इंग्रजांना पळवून सोडले. २२ मे १८५८ च्या कल्पीच्या लढाईनंतर राणी ३०-३१ मे १८५८ रोजी ग्वाल्हेरला आल्या.तेथे स्वस्त न बसता लक्ष्मीबाईनी आपल्या सैन्याची कवायत नियमित सुरू ठेवली. इंग्रजांना रोखण्यासाठी कशा प्रकारे मोर्चे बांधणी करावी या विषयी त्यांनी चर्चा केली. अचानक याचवेळी १७ जून १८५८ रोजी ब्रिटिश अधिकारी स्मिथ सैन्यासह ग्वाल्हेरच्या अगदी जवळ "कोटा की सराय" येथे येऊन पोहोचला व त्याने त्वरित हल्ला चढवला.अशा परिस्थितीत लक्ष्मीबाईने रणांगणात धाव घेतली आणि लक्ष्मीबाईने ब्रिटिश शिपायांना तलवारीने सपासप कापत सामोरं जात होत्या. विजेसारख्या तळपणाऱ्या राणीकडे पाहून त्यांच्या सैनिकांमध्ये आणखी जोश आला व ब्रिटिश सैन्याला छाटुन काढले.अशा परिस्थितीत इंग्रज अधिकारी स्मिथचे सैन्य मागे हटणार होते.परंतु घात झाला आणि नव्या दमाची एक फौज बाजूच्या टेकडीवरून चालून आली.अशा परिस्थितीत आपला टिकाव लागणार नाही हे पाहुन स्वारांनिशी बाहेर पडल्या.थोडे पुढे जाताच एका ओढ्यापाशी त्यांचा "राजरत्न" नावाचा (हा नवीन घोडा होता) घोडा अडला.नेहमीचा "सारंगी" नावाचा घोडा शेवटच्या लढाईत त्यांच्याबरोबर नव्हता.अशा परिस्थितीत काही केल्या घोडा ओढा ओलांडत नव्हता. इंग्रजांशी लढत असतांना राणी लक्ष्मीबाई रक्तबंबाळ होऊन घोड्यावरून खाली कोसळल्या.परंतु पुरूषी वेशात असलेल्या राणी लक्ष्मीबाई यांना इंग्रज ओळखू शकले नाहीत व इंग्रज पुढे निघून गेले.

घायाळ झालेल्या राणी लक्ष्मीबाई यांना सेवक रामचंद्र देशमुखांनी फुलबाग येथील बाबा गंगादास यांच्या मठात आणले.आपला देह इंग्रजांच्या हाती लागू नये अशी त्यांची इच्छा होती. फुलबाग येथे बाबा गंगादास यांच्या मठात तात्या टोपे, रामचंद्रराव देशमुख, काशीबाई कुनविन, गुलमोहम्मद, बांदा नवाब बहादुर अली आणि दामोदर राव यांनी मुखाग्नी दिली.अशा प्रकारे महान योध्या राणी लक्ष्मीबाई यांनी वीरमरण पत्करुन वयाच्या तेविसाव्या वर्षी प्राणज्योत मालवली.राणी लक्ष्मीबाईचा स्वर्गवास १७ जून १८५८ ला झाला.परंतु इंग्रज सरकारने राणी लक्ष्मीबाईना १८ जूनला मृत घोषित केले.त्यामुळे १८ जुनला पुण्यतिथी साजरी केली जाते. त्यांची यशोगाथा भारतवर्ष कधीही विसरणार नाही.जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकाश -पाताळ आहे तोपर्यंत झाशीची राणी लक्ष्मीबाई याचे नाव अमर राहील. देशात झाशीची राणी लक्ष्मीबाई याची प्रेरणा निरंतर आपल्या हृदयात रहावी यासाठी त्यांच्या जयंतीनिमित्त देशात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड व्हायला हवी. कारण आज बदलत्या हवामानामुळे मानवासह संपूर्ण जीवसृष्टी धोकादायक स्थितीत येऊन ठेपली आहे व भयभीत झाली आहे.

यावर उपाय म्हणून झाशीची राणी यांच्या जयंतीनिमित्त मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केली पाहिजे.असे जर झाले तर आपल्याला प्रत्येक झाडाच्या पानांत,फुलात, फळात झाशीची राणी लक्ष्मीबाई याचे दर्शन अवश्य होईल. राणी लक्ष्मीबाई यांना जयंतीनिमित्त माझा कोटी कोटी प्रणाम.जय हिंद!

- ९९२१६९०७७९

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com / ई-पेपर : epaper.sinhvani.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

नागपूर जिल्हा महिला साहित्य संमेलनाचे २० रोजी उद्घाटन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या अनुदानातून व स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाद्वारे संचालित महिला महाविद्यालय, नंदनवन,नागपूर यांच्या सहकायनि आयोजित दोन दिवसीय नागपूर जिल्हा महिला साहित्य संमेलनाचे उद्घाटन शुक्रवार, २० नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता होत आहे. महिला महाविद्यालय, १५२, गणेशनगर येथे होत असलेल्या या संमेलनाचे उद्घाटन कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर उपस्थित राहणार आहेत. संमेलनाध्यक्ष प्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. प्रभा गणोरकर असून स्वागताध्यक्ष स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रवींद्र फडणवीस आहेत. कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे सदस्य श्रीपाद अपराजित, डॉ. प्रमोद मुनघाटे, प्रकाश होळकर आणि महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रीता सोनटके यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

उद्घाटन सोहळ्यानंतर 'सेतू की संकट?' व 'मी अलीकडे वाचलेल्या स्त्रियांच्या कविता' या विषयावर परिसंवाद तसेच, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या दोन दिवसीय संमेलनात साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम २२ नोव्हेंबरला

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम रविवार, दि. २२ नोव्हेंबर २०२६ रोजी महाल येथील गडकरी वाडा येथे आयोजित करण्यात आला आहे.

महालातील गडकरी वाडा येथे मा. मंत्री महोदय यांच्या जनसंपर्क कार्यालयात सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत हा कार्यक्रम होईल. या वेळेत मंत्री महोदय नागरिकांची निवेदने स्वीकारतील. मा. मंत्री महोदय नागरिकांना व्यक्तिशः भेटतील आणि त्यांच्याशी संवाद साधतील. नागरिकांनी आपल्या समस्या, अडचणी, मागण्या लेखी स्वरुपातच (आवश्यक कागदपत्रे जोडून) आणाव्यात. तसेच आपली लेखी निवेदने मा. मंत्री महोदयांना द्यावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. त्यानंतर दुपारी १ ते २ या कालावधीत नितीन गडकरी आपल्या जनसंपर्क कार्यालयात भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना भेटतील.

बल्लारपूर पोलिसांची अवैध रेती वाहतुकीवर कारवाई : २५.५६ लाखांचा हायवा व रेती जप्त

दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर- धनंजय पांढरे

विनापरवाना आणि रॉयल्टी न भरता रेतीची अवैध वाहतूक करणाऱ्या हायवा ट्रकवर बल्लारपूर पोलिसांनी कारवाई केली. जुनोना गावातील चौकात सापळा रचून पोलिसांनी १२ चाकी हायवा ट्रक पकडला. या कारवाईत ८ ब्रास रेतीसह एकूण २५ लाख ५६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई १९ नोव्हेंबर रोजी पहाटे करण्यात आली. या प्रकरणी हायवा चालक मोहित विलास गज्जलवार २६ वर्षे रा. चेक बल्लारपूर, ता. पोंभुर्णा आणि हायवा मालक मनोज निखारे रा. चिंतलधाबा, ता. पोंभुर्णा यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालात २५ लाख रुपये किमतीचा हायवा ट्रक क्रं एमएच ३४ सीक्यू २६५२ आणि ५६ हजार रुपये किमतीची ८ ब्रास रेतीचा समावेश आहे.



बल्लारपूर पोलीस ठाण्याचे पथक रात्री गस्तीवर असताना चिचपल्ली ते जुनोना मार्गावरून रेती भरलेला हायवा येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी पंचांना सोबत घेऊन जुनोना चौकात सापळा रचला. काही वेळातच आसेगाव-गिलबिली मार्गाने आलेला संशयित हायवा थांबवून तपासणी केली असता त्यात मोठ्या प्रमाणात रेती आढळून आली. चालकाकडे रेती वाहतुकीचा रॉयल्टी परवाना मागितला असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याचे उघड झाले. त्यानंतर पोलिसांनी पंचनामा करून वाहन व रेती जप्त केली.सदर कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, सहायक पोलीस अधीक्षक कुमार सुशांत राजुरा यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बिपिन इंगळे, सहायक पोलीस निरीक्षक अनिल राऊत यांचा नेतृत्वात महिला पोलीस उपनिरीक्षक करिश्मा मोरे आणि पोलीस हवालदार यशवंत कुमरे यांनी केली. या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२), ३(५) तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या कलम ४८(७) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फुटाळा पार्किंगमधील अनधिकृत शेडवर मनपाचा हातोडा



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर महानगरपालिकेच्या वतीने फुटाळा परिसरातील एनएमसी पार्किंगमधील अनधिकृत शेडवर आज धडक निष्कासन कारवाई करून ते पाडण्यात आले आहेत. या अतिक्रमणामुळे पार्किंगच्या जागेत अडथळा निर्माण होत होता, जो आता पूर्णपणे दूर करण्यात आला आहे. शहरातील सार्वजनिक जागा आणि रस्ते अतिक्रमण मुक्त ठेवण्यासाठी महापालिकेची ही मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे. नागरिकांनी स्वतःहून अतिक्रमणे काढून घ्यावीत, अन्यथा नियमानुसार कडक कारवाई सुरूच राहील, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. या कारवाईमुळे नागपूर शहर अतिक्रमणमुक्त करण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आहे.

सदर कारवाई मा.आयुक्त मनपा नागपूर, मा. पोलीस आयुक्त नागपूर शहर, उपायुक्त वाहतूक, नागपूर यांच्या संयुक्तिक मार्गदर्शनाखाली करण्यात आली. अतिक्रमण निर्मुलन कारवाई मधे धरमपेठ झोन चे सहाय्यक

शहर अतिक्रमणमुक्त मोहिमेला वेग

आयुक्त श्री. राजकुमार मेश्राम, अतिक्रमण पथक धरमपेठ झोन, एन.डी.एस अधिकारी चे अतिक्रमण कर्मचारी व केंद्रीय अतिक्रमण पथक संपूर्ण कार्यवाहीमध्ये उपस्थित होते.

नागरिकांना आणि वाहनधारकांना होणारा वाहतुकीचा त्रास कमी करणे तसेच शहरात फुटतात नागरिकांना मोकळे करुन देने हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. आगामी दिवसांत शहरातील इतर प्रमुख मार्गांवरही अशाच प्रकारची कडक कारवाई सुरूच राहणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

४१ वर्षानंतर आई जगदंबेच्या चरणी रजत वैभवाचा भव्य सोहळा!

नूतन चांदीचे कवच, शस्त्रे, छत्र व सुवर्ण अलंकारांनी सजणार जगदंबेचे रूप, २२ नोव्हेंबरपासून भाविकांना दर्शन

दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी

विदर्भातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी येथे तब्बल ४१ वर्षांनंतर आई जगदंबेच्या नूतन रजत कवच आणि अलंकारांचा भव्य धार्मिक सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

शुक्रवार, २० नोव्हेंबर रोजी देवीसाठी नव्याने तयार करण्यात आलेले चांदीचे कवच, शस्त्रे, छत्र तसेच सुवर्ण आभूषणांचे शास्त्रोक्त पद्धतीने शुद्धीकरण, पूजन आणि अभिषेक करण्यात येणार आहे. रविवार, २२ नोव्हेंबरपासून भाविकांना या नूतन अलंकारांनी सजलेल्या आई जगदंबेच्या दिव्य स्वरूपाचे दर्शन घेता येणार आहे.

यापूर्वी ४१ वर्षांपूर्वी अशा स्वरूपाचा रजत कवच आणि अलंकारांचा सोहळा पार पडला होता. त्यामुळे यंदाचा सोहळा संस्थानच्या धार्मिक परंपरेतील ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण पर्व ठरणार आहे. चार दशकांनंतर आई जगदंबेला नूतन रजत आणि सुवर्ण अलंकारांनी सजविण्यात येणार असल्याने भाविकांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण आहे. देवीच्या मूर्तीसाठी अत्यंत कलात्मक आणि पारंपरिक धार्मिक शैलीत चांदीचे कवच, विविध शस्त्रे आणि छत्र तयार करण्यात आले आहे. त्यासोबत सुवर्ण आभूषणांनी देवीचा शृंगार करण्यात येणार आहे. रजत आणि सुवर्ण अलंकारांच्या तेजाने आई जगदंबेचे स्वरूप अधिक भव्य आणि मनोहारी दिसणार आहे.

शुक्रवार, २० नोव्हेंबर रोजी वेदमंत्रांच्या घोषात सर्व नूतन अलंकारांचे शुद्धीकरण, पूजन आणि अभिषेकाचे धार्मिक विधी पार पडतील. त्यानंतर विधिपूर्वक हे अलंकार देवीला धारण करविण्यात येतील. या सोहळ्यामुळे मंदिर परिसरात भक्तिमय आणि मंगलमय वातावरण निर्माण होणार आहे.

आजपासून एन.टी.पी.सी. गेटवर प्रकल्पग्रस्तांचे बेमुदत उपोषण

दै. सिंहवाणी वृत्त, मौदा

एन.टी.पी.सी. मौदा प्रकल्पामुळे बाधित झालेल्या सर्व प्रमाणपत्रधारक प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरूपी नोकरी मिळावी आणि इतर प्रलंबित मागण्या पूर्ण व्हाव्यात यासाठी शुक्रवार, दिनांक २० नोव्हेंबर २०२६ रोजी एन.टी.पी.सी. गेट क्रमांक २ समोर बेमुदत उपोषण करण्यात येणार आहे. याबाबतची पूर्वसूचना नगर पंचायत मौदाचे नगराध्यक्ष प्रसन्ना (राजा) बाबुराव तिडके यांनी एन.टी.पी.सी. मौदाचे मुख्य महाप्रबंधक यांना दिली आहे.

प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्यांसाठी यापूर्वी अनेक वेळा आंदोलन, उपोषण व पत्रव्यवहार करण्यात आला आहे. दिनांक ०१ मार्च २०२३ रोजी प्रकल्पग्रस्तांनी एन.टी.पी.सी. गेट क्रमांक २ समोर कायमस्वरूपी नोकरीच्या मागणीसाठी आमरण उपोषण केले होते. त्यानंतर दिनांक ०९ मार्च २०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे झालेल्या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडविण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, अद्यापपर्यंत त्या आश्वासनांची प्रभावी अंमलबजावणी झालेली नाही.



त्यानंतर जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडे वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला. परंतु, त्यातून कोणताही ठोस निर्णय झाला नाही. त्यामुळे दिनांक २६ सप्टेंबर २०२३ रोजी प्रकल्पग्रस्तांनी तहसील कार्यालय, मौदा येथे उपोषण केले होते. त्यावेळी तत्कालीन आमदार टेकचंदजी सावकर यांच्या उपस्थितीत प्रकल्पग्रस्तांना कायम नोकरी देण्याचे लेखी आश्वासन देण्यात आले. त्यानंतर उपोषण स्थगित करण्यात आले, मात्र आजपर्यंत प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.

मुख्य महाप्रबंधक यांनी स्वतः या गंभीर विषयात लक्ष घालून प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा व एन.टी.पी.सी. कॉर्पोरेट सेंटर, नवी दिल्ली येथील वरिष्ठ प्रशासनाकडे पाठपुरावा करून प्रकल्पग्रस्तांच्या न्याय्य मागण्या मंजूर करून घेण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी वारंवार विनंती करण्यात आली होती. तरीही, अद्यापपर्यंत प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांवर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.

प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे त्रस्त झालेल्या समस्त प्रकल्पग्रस्तांनी आपल्या न्याय्य हक्कांसाठी शुक्रवार, दिनांक २० नोव्हेंबर २०२६ रोजी एन.टी.पी.सी. गेट क्रमांक २ समोर मोठ्या संख्येने बेमुदत उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत ची माहिती माजी आमदार टेकचंद सावरकर, मौद्याचे नगराध्यक्ष प्रसन्ना तिडके, एन टी पी सी क्रांतिकारी प्रकल्पग्रस्त शेतकरी संघर्ष समिती चे अध्यक्ष एकनाथ वडे, अनिकेत पिकलमुंडे, तेजराम मोटघरे, राकेश वाघमारे,कैलास मोटघरे, अभिलाष मोटघरे, रवि अवचट यांनी मौदा येथे घेतलेल्या पत्र परिषदेत दिली.

थोडक्यात

रोहित पठारे हत्याकांडातील आरोपींवर कठोर कारवाई करा!

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर येथे जुन्या वादातून झालेल्या रोहित पठारे हत्याकांडातील सर्व आरोपींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती विभागाच्या वतीने नागपूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची भेट घेऊन मुख्यमंत्र्यांच्या नावे निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात रोहित पठारे यांची अत्यंत क्रूर आणि अमानुष पद्धतीने हत्या करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. आरोपींनी रोहित यांना घरातून ओढत बाहेर आणले, त्यांचे पाय बांधून चौकाचौकांत बेदम मारहाण केली. तसेच स्क्रू ड्रायव्हरने पायावर वार करून त्यांना गंभीर यातना दिल्या. या अमानुष घटनेमुळे अनुसूचित जाती समाजासह संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची भावना निर्माण झाली असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. एवढी गंभीर आणि क्रूर घटना घडूनही सरकार मौन का बाळगून आहे, असा सवालही प्रतिनिधींनी उपस्थित केला.

या प्रकरणातील सर्व आरोपींविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करावी आणि पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी शासनाने तातडीने प्रभावी पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभागाचे प्रदेश सचिव राजेश रंगारी यांच्या पुढाकाराने हे निवेदन देण्यात आले. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष स्वप्निल पातोळे, वरिष्ठ महासचिव दिनेश वाघमारे, महासचिव प्रफुल्ल भाजे, सचिव रवदीप रंगारी, सचिव गुणवंत सोनटक्के, सचिव कपिल दामोदर, सचिव सम्मी करोसिया, माजी नगरसेवक मनोज सांगोळे, राजीव अंबादे यांच्यासह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दुष्काळाचे सावट; पाणीटंचाईच्या उपाययोजनांची प्रशासनाकडून तपासणी!

उपजिल्हाधिकारी गणेश मरकड यांचा सहा गावांसह भिवापूर नगरपंचायतीला दौरा; नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन



दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

यंदाच्या दुष्काळी परिस्थितीमुळे तालुक्यात उन्हाळ्यात तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. संभाव्य संकटाची चाहूल लक्षात घेऊन प्रशासनाने आतापासूनच उपाययोजनांचा धडाका सुरू केला आहे. मात्र, या उपाययोजना कागदावरच राहू नयेत, यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशांनुसार गुरुवारी (ता. १९) उपजिल्हाधिकारी गणेश मरकड यांनी तालुक्यातील सहा गावांसह भिवापूर नगरपंचायत क्षेत्राला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. मौजा चिखली, वडध, नक्षी, मोखाडा, रोहणा तसेच भिवापूर नगरपंचायत क्षेत्रात पाणीटंचाई निवारणासाठी करण्यात येत असलेल्या उपाययोजनांचा त्यांनी आढावा घेतला. संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी प्रशासनाकडून कोणत्या उपाययोजना केल्या जात आहेत, त्यांची सद्यस्थिती काय आहे, याची तपासणी करण्यात आली. यावेळी गावातील नागरिकांशी संवाद साधून पाण्याचा काटकसरीने वापर करण्याबाबत मार्गदर्शनही करण्यात आले.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाणीटंचाईचे संकट अधिक गडद होण्याची शक्यता असल्याने केवळ प्रशासनाच्या उपाययोजना पुरेशा ठरणार नाहीत. नागरिकांचाही सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे या दौऱ्यातून अधोरेखित करण्यात आले. पाहणीदरम्यान संबंधित गावांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.यावेळी प्रभारी तहसीलदार मनोज वाडे, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभागीय अभियंता तुरकर, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी पार्थ सिडाम, कृषी विभागाचे अधिकारी-कर्मचारी तसेच ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

उषा चिटमुलवार यांचे निधन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर



श्रीमती उषा चिटमुलवार (वय ८२ वर्षे) यांचे आज सकाळी ११ वाजता राहत्या घरी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने आकस्मिक निधन झाले. त्या डॉ. विकास चिटमुलवार यांच्या मातोश्री होत. त्यांच्या निधनाने चिटमुलवार परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात दोन मुली, दोन मुले तसेच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा शुक्रवारी सकाळी ११ वाजता. त्यांच्या राहत्या निवासस्थान, ७२, रविंद्रनगर, राणा प्रतापनगर, नागपूर येथून निघून सहकारनगर घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येईल.

आशाताई गंगारामजी आखरे यांचे निधन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर



चक्रपाणी नगर, प्लॉट नं. ५ येथील रहिवासी, आशाताई गंगारामजी आखरे याचं दिनांक १७ नोव्हेंबर रोजी, निधन झाले. त्या मृत्युसमयी ८५ वर्षाच्या होत्या. त्या नंदकिशोर आखरे यांच्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात ३ मुले आणि दोन बहीनी असा बराच मोठा आप्तपरिवार आहे. अंतिम संस्कार मानेवाडा घाटावर झाला.

बल्लारपुरात कत्तलीसाठी जनावरांची अवैध वाहतूक उघड : ६.४० लाखांचा मुद्देमाल जप्त, तिघे ताब्यात

दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर-धनंजय पांढरे

कत्तलीच्या उद्देशाने जनावरांना निर्दयतेने वाहनात डांबून अवैधरित्या वाहतूक केली जात असल्याचा प्रकार बल्लारपूर पोलिसांनी उघडकीस आणला. नगर परिषद चौक परिसरात नाकाबंदी करून पोलिसांनी एका पिकअप वाहनातून दोन म्हशी आणि पाच रेड्यांची सुटका केली. या कारवाईत जनावरांसह पिकअप वाहन असा एकूण ६ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई १८ नोव्हेंबर रोजी सकाळी करण्यात आली.



या प्रकरणी सैयद मुबारक सैयद राजमोहमद ३३ वर्षे, रा. इस्लामपुरा वार्ड, वणी, फिरोज रसुल शेख २८ वर्ष, रा. रंगनाथनगर वार्ड, वणी आणि सैयद गुलाम नबी सैयद रियाज अली ३० वर्ष, रा. रंगनाथनगर, वणी, जि. यवतमाळ यांना ताब्यात घेण्यात आले आहे. पोलिसांनी एमएच २९ सीएम १४६० क्रमांकाच्या पिकअप वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये पाच रेडे आणि दोन म्हशी अत्यंत आखूड दोरीने बांधलेल्या अवस्थेत आढळून आल्या. जनावरांच्या वाहतुकीसाठी आवश्यक परवाना व वैद्यकीय प्रमाणपत्र मागितले असता संबंधितांकडे ते नसल्याचे समोर आले.

पोलिसांनी केलेल्या तपासणीत जनावरांना क्षमतेपेक्षा अधिक संख्येने वाहनात कोंबण्यात आले होते. तसेच चारा-पाणी आणि औषधोपचाराची कोणतीही व्यवस्था करण्यात आली नव्हती. या निर्दयी वाहतुकीमुळे जनावरांना त्रास होत असल्याचे निदर्शनास आले. दोन म्हशींची किंमत ६५ हजार रुपये, पाच रेड्यांची किंमत ७५ हजार रुपये, तर पिकअप वाहनाची किंमत पाच लाख रुपये, असा एकूण ६ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई पोलीस निरीक्षक बिपिन इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक शब्बीरखान पठाण, पोलीस हवालदार संदेश वाघमारे, पोलीस अंमलदार अंकुश बुरांडे , सुजीत आणि साईनाथ यांच्या पथकाने केली. याप्रकरणी प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमातील संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया करण्यात आली.

थोडक्यात

माऊली नगरात २२ नोव्हेंबरला भव्य श्याम जन्मोत्सवाचे आयोजन!

कीर्तन संध्येला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आयोजकांचे आवाहन

दे. सिंहवाणी वृत्त, वाडी

वाडी नगरपरिषद क्षेत्रातील आदर्शवाडी येथील माऊली नगर परिसरात शनिवार, २२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता भव्य श्याम जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या कीर्तन संध्येत भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. यासंदर्भात वाडी पत्रकार संघात आयोजित पत्रकार परिषदेत आयोजन समितीचे पदाधिकारी नगरसेवक संदीप चरडे, कैलाश मंथापूर्वक, माजी नगरसेवक राकेश मिश्रा, राजेश गिरी, दामू ज्योध, उत्तम बोबडे, राजेश घागरे व धनंजय मालोदे यांनी कार्यक्रमाची माहिती दिली.

आयोजकांनी दिलेल्या माहितीनुसार, श्याम जन्मोत्सवानिमित्त आयोजित कीर्तन संध्येत प्रसिद्ध भजन गायक श्याम शुभम, हर्ष शर्मा आणि निहारिका पुरोहित आपल्या सुमधुर भजनांची प्रस्तुती देणार आहेत. भक्तिमय भजनांच्या माध्यमातून परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण होणार असून, भाविकांना भक्तिरसाचा आनंद घेता येणार आहे. या कार्यक्रमाला क्षेत्राचे आमदार समीर मेघे, नगराध्यक्ष नरेश चरडे, माजी नगरसेवक राजेश जयस्वाल, उद्योजक सतीश जिंदल, माजी सरपंच अशोक माने तसेच सामाजिक कार्यकर्ते संजय गोयल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. श्याम जन्मोत्सव समितीच्या वतीने तसेच अरुण अंबरते, गणेश इंगळे, विकी पाठक, राहुल ठाकरे, मदन गोहते व अनिल कोरडे यांनी परिसरातील सर्व श्यामभक्त व नागरिकांनी या भक्तिमय सोहळ्यात मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन केले आहे.

माजी सैनिकांच्या मुलींच्या वसतिगृहात अधीक्षिका पदाची भरती, ३० नोव्हेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

दे. सिंहवाणी वृत्त, नागपूर

जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, नागपूर यांच्या अधिपत्याखालील माजी सैनिकांच्या मुलींच्या वसतिगृहात अशासकीय वसतिगृह अधीक्षिका (महिला) या एका पदासाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. हे पद तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पद्धतीने भरण्यात येणार असून, निवड झालेल्या उमेदवारास दरमहा ३२ हजार ८९५ रुपये एकत्रित मानधन देण्यात येणार आहे. यासाठी पात्र व इच्छुक महिला उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. इच्छुक उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह ३० नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, प्रशासकीय इमारत क्रमांक १, तिसरा मजला, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे अर्ज सादर करावेत. अजासौबत वैयक्तिक अर्ज, संगणक प्रमाणपत्र, मराठी टंकलेखन प्रमाणपत्र, आधार कार्ड, रहिवासी दाखला, पीपीओ, बँक पासबुक, डिस्चार्ज बुक तसेच इतर शैक्षणिक कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. मुलाखतीची तारीख व वेळ स्वतंत्रपणे कळविण्यात येणार आहे.

या भरतीमध्ये युद्ध विधवा, सेवारत सैनिकांच्या विधवा आणि माजी सैनिकांच्या विधवा यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. या प्रवगार्तील उमेदवार उपलब्ध न झाल्यास माजी सैनिकांच्या पत्नी तसेच इतर नागरिक महिला उमेदवारांचाही विचार केला जाणार आहे. सदर पद निवासी स्वरूपाचे असून, नियुक्त उमेदवारास वसतिगृह परिसरातच वास्तव्य करणे अनिवार्य आहे. त्यासाठी वसतिगृहात स्वतंत्र अधीक्षिका निवासाची व्यवस्था उपलब्ध आहे. उमेदवारास संगणक व मराठी टंकलेखनाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. तसेच वसतिगृहातील मुलींची देखभाल, शिस्त, सुरक्षितता आणि दैनंदिन व्यवस्थापनाची जबाबदारी पार पाडावी लागणार आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाशी कार्यालयीन वेळेत ०७१२-२५६११३३ किंवा ९४०३७८०५१५ या दूरध्वनी क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, नागपूर यांनी केले आहे.

श्रीमंत राजे रघुजी महाराज भोंसले (चतुर्थ) यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन



दे. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूरच्या गौरवशाली इतिहासाचे आणि भोंसले राजघराण्याच्या समृद्ध परंपरेचे प्रतीक असलेले श्रीमंत राजे रघुजी महाराज भोंसले (चतुर्थ) यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी श्रीमंत राजे रघुजी महाराज भोंसले (चतुर्थ) यांच्या ऐतिहासिक कार्याचे, कर्तृत्वाचे आणि नागपूरच्या जडणघडणीत भोंसले राजघराण्याने दिलेल्या अमूल्य योगदानाचे स्मरण करण्यात आले. तसेच नागपूरच्या या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाचे जतन व संवर्धन करण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला.



या अभिवादन कार्यक्रमाला भोंसले राजघराण्यातील राजे रघुजी महाराज भोंसले, पाचवे राजे मुधोजी महाराज भोंसले आणि राजे जयसिंह महाराज भोंसले उपस्थित होते. त्यांच्यासह नगरसेविका मंगला मस्के, नगरसेविका मानसी शिमले, मराठा विद्या प्रसारक समाजाचे कार्याध्यक्ष प्रविण शिर्के, मुख्य सचिव डॉ. प्रकाश मोहिते, कोषाध्यक्ष निलेश चव्हाण, उपाध्यक्ष राजेश काटे, संचालक सतीष मोहिते यांनीही अभिवादन केले. या प्रसंगी महाराजा ऑफ नागपूर ट्रस्टचे सचिव अतुल ढगे, कायदेशीर सल्लागार प्रदिप दीपप्रज्वलन करून करण्यात आली. नागपूर-अमरावती विभागाचे माहिती व जनसंपर्क संचालक डॉ. गणेश मुळे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय प्राकृतिक चिकित्सा परिषदेचे क्षेत्रीय मंत्री डॉ. धनलाल शेंदरे होते. यावेळी विशेष अतिथी म्हणून नागपूर महानगरपालिकेचे माजी महापौर दयाशंकर तिवारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. युवराज काळे, माजी निमा अध्यक्ष डॉ. शांतीलाल लुंगे, नागपूर महानगरपालिकेचे नगरसेवक डॉ. निलेश गावधने, भूवैकुंठ आत्मानुसंधान, अड्याळ टेकडीचे अध्यक्ष डॉ. नवलाजी मुळे आणि ज्येष्ठ पत्रकार अविनाश महालक्ष्मे यांची प्रमुख उपस्थिती होती. उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी प्राकृतिक चिकित्सा पद्धतीचे महत्त्व विशद करताना आधुनिक जीवनशैलीमुळे निर्माण होणाऱ्या आरोग्यविषयक समस्यांवर नैसर्गिक उपचारपद्धती, योग, प्राणायाम आणि संतुलित आहार यांचे महत्त्व अधोरेखित केले. निरोगी जीवनासाठी केवळ उपचारांवर अवलंबून न राहता प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या सन्मानार्थ शिवसैनिकांचे व्हेरायटी चौकात आंदोलन

दे. सिंहवाणी वृत्त, नागपूर

शिवसेना नागपूर शहर तर्फे पूर्व विदर्भ संघटक किरण पांडव व संपर्कप्रमुख संजयजी निरुपम यांच्या मार्गदर्शनात तसेच जिल्हाप्रमुख सुरज गोजे व समीर शिंदे यांच्या नेतृत्वात नागपूरच्या व्हेरायटी चौक येथे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर जी सावरकर यांच्या सन्मानार्थ आंदोलन करण्यात आले.



स्वातंत्र्यवीर सावरकर यांना भारतरत्न द्यावे अशी मागणी सर्वत्र होत असतानाच गांधी परिवाराकडून वारंवार स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी आक्षेपार्ह वक्तव्य होत असतात. तीच धुरा पुढे नेत सोनिया गांधी लिखित 'Belonging: A Journey of Love' या पुस्तकातील स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्याविषयीच्या आक्षेपार्ह मजकुराच्या निषेधार्थ नागपूरच्या व्हेरायटी चौकात शिवसेनेच्या वतीने आंदोलन करत त्या मजकुराचा विरोध करण्यात आला. स्वातंत्र्यवीर सावरकर हे प्रत्येक भारतीयाचे प्रेरणास्थान असून त्यांनी केलेल्या संघर्ष आणि त्यागाचा प्रत्येकाला अभिमान आहे. परंतु, बाहेरून आलेले व्यक्ती भारतात राहून, स्वतःच्या पुस्तकात क्रांतिवीरांचा अपमान करत असेल, तर शिवसैनिक ते कदापि सहन करून घेणार नाही.

स्वातंत्र्यवीर सावरकरांची प्रतिमा सोबत घेत शिवसैनिकांनी या पुस्तकातील आक्षेपार्ह पाने व मजकूर हटवण्याची मागणी केली. अन्यथा पुस्तकाची विक्री होऊ देणार नाही, असा ठाम इशाराही यावेळी देण्यात आला.

यावेळी महिला जिल्हा संघटिका मनीषाताई पापडकर युवा सेना जिल्हाप्रमुख शरदजी सरोदे शहर प्रमुख राजू तुमसरे, विकास आंभोरे, विशाल कोरके, राजाभाऊ रामद्वार, धम्मा सोनटक्के, प्रवीण कोहाड, रोहित कटरे, सागर मैंदेकर, कमलाकर सावरकर राकेश भोंदले, आजद सिंग ठाकूर, गौरव तिजारे, विशाल मानकर, हेमंत बगवे सुधीर कमलकर रजत देशमुख श्रीरंग साधू प्रशांत फुलझले भगवंत बागडे राजू पाटील राजेश सनाकत महेश पारधी शिवसेना, युवासेना, महिला आघाडी, शिवसेनेच्या सर्व आघाड्यांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते.

दिवाळीत गोरेवाडा प्राणीसंग्रहालय पर्यटकांचे आकर्षण, १५ दिवसांत १३ हजारांहून अधिक पर्यटकांची भेट ५५ लाखांहून अधिक रुपयांचा महसूल प्राप्त, इंडियन सफारीला पर्यटकांची विशेष पसंती

दे. सिंहवाणी वृत्त, नागपूर

बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणीसंग्रहालयात यंदाच्या दिवाळी सुट्ट्यांमध्ये पर्यटकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या १५ दिवसांत तब्बल १३ हजार ७८ पर्यटकांनी प्राणीसंग्रहालयाला भेट दिली. या माध्यमातून प्राणीसंग्रहालयाला ५५ लाख ४१ हजार ५६० रुपयांचा महसूल प्राप्त झाला आहे. नागपूर शहरातील हे आंतरराष्ट्रीय प्राणीसंग्रहालय पर्यटकांसाठी आकर्षणाचे प्रमुख केंद्र बनत असून, दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये लहान मुले, तरुण, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसह विविध वयोगटांतील नागरिकांनी कुटुंबीयांसह येथे भेट देण्यास पसंती दिली.

प्राणीसंग्रहालयातील इंडियन सफारी हे पर्यटकांचे विशेष आकर्षण ठरत आहे. या सफारीदरम्यान पर्यटकांना वाघ, अस्वल, बिबट्या तसेच विविध प्रजातींचे तृणभक्षी प्राणी त्यांच्या नैसर्गिक अधिवासासारख्या वातावरणात पाहण्याची संधी मिळते. वन्यजीवांना त्यांच्या नैसर्गिक वातावरणात जवळून पाहण्याचा अनुभव पर्यटकांसाठी विशेष आनंददायी ठरत आहे. गोरेवाडा प्राणीसंग्रहालयाला मिळणारा वाढता प्रतिसाद लक्षात घेता, एफडीसीएम गोरेवाडा झू लिमिटेड प्रशासनाने नागरिकांना आपल्या कुटुंबीयांसह बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणीसंग्रहालयाला भेट देऊन इंडियन सफारीचा आनंद घेण्याचे आवाहन केले आहे. अधिक माहिती सहाय्यक वनसंरक्षक-१ तथा जनसंपर्क अधिकारी, बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणीसंग्रहालय, नागपूरयेथे संपर्क साधावा अथवा ई-मेल : acfl@wildgorewada.com वर संपर्क साधावा.

भाऊसाहेब मुळक आयुर्वेद महाविद्यालयात राष्ट्रीय प्राकृतिक चिकित्सा दिवस

प्राकृतिक चिकित्सा, स्वस्थ भारत संकल्पनेतून निरोगी जीवनशैलीचा संदेश; २०० हून अधिक मान्यवर, विद्यार्थी व नागरिकांचा सहभाग

दे. सिंहवाणी वृत्त, नागपूर

भाऊसाहेब मुळक आयुर्वेद महाविद्यालय व मेडिकल सायन्स अँड रिसर्च हॉस्पिटल, नंदनवन, नागपूर येथील स्वास्थवृत्त व योग विभागाच्या वतीने अखिल भारतीय प्राकृतिक चिकित्सा परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने ९ वा राष्ट्रीय प्राकृतिक चिकित्सा दिवस तसेच परिषदेचा ८१ वा संकल्पना दिवस १८ नोव्हेंबर २०२६ रोजी मोठ्या उत्साहात आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. यावर्षीच्या कार्यक्रमासाठी ह्याप्राकृतिक चिकित्सा, स्वस्थ भारतह्न ही संकल्पना निश्चित करण्यात आली होती. प्राकृतिक चिकित्सा, योग, संतुलित आहार आणि नैसर्गिक जीवनशैलीच्या माध्यमातून निरोगी समाजाची निर्मिती करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. नागपूर-अमरावती विभागाचे माहिती व जनसंपर्क संचालक डॉ. गणेश मुळे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय प्राकृतिक चिकित्सा परिषदेचे क्षेत्रीय मंत्री डॉ. धनलाल शेंदरे होते. यावेळी विशेष अतिथी म्हणून नागपूर महानगरपालिकेचे माजी महापौर दयाशंकर तिवारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. युवराज काळे, माजी निमा अध्यक्ष डॉ. शांतीलाल लुंगे, नागपूर महानगरपालिकेचे नगरसेवक डॉ. निलेश गावधने, भूवैकुंठ आत्मानुसंधान, अड्याळ टेकडीचे अध्यक्ष डॉ. नवलाजी मुळे आणि ज्येष्ठ पत्रकार अविनाश महालक्ष्मे यांची प्रमुख उपस्थिती होती. उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी प्राकृतिक चिकित्सा पद्धतीचे महत्त्व विशद करताना आधुनिक जीवनशैलीमुळे निर्माण होणाऱ्या आरोग्यविषयक समस्यांवर नैसर्गिक उपचारपद्धती, योग, प्राणायाम आणि संतुलित आहार यांचे महत्त्व अधोरेखित केले. निरोगी जीवनासाठी केवळ उपचारांवर अवलंबून न राहता प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि आरोग्यदायी सवयींचा अंगीकार करणे आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रांतील मान्यवर, प्राध्यापक, विद्यार्थी आणि नागरिकांसह २०० हून अधिक जण उपस्थित होते.



कार्यक्रमात विविध विषयांवरील तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. योगगुरू डॉ. पंकज शुक्ला यांनी 'दैनंदिन जीवन में योग प्राणायाम' या विषयावर उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले. दैनंदिन जीवनात योग आणि प्राणायामाचा नियमित सराव केल्याने शारीरिक व मानसिक आरोग्य उत्तम राखण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले. केवळ योगाचे महत्त्व सांगण्यापुरते मर्यादित न राहता त्यांनी उपस्थितांकडून विविध योगासने आणि प्राणायामाची प्रत्यक्ष प्रात्यक्षिके करून घेतली. त्यामुळे उपस्थितांना योगाभ्यासाचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला. त्यानंतर अभियंता रविकिरण महाजन (नियोजक - निसर्गायण मंडळ) यांनी 'प्राकृतिक चिकित्सा वैज्ञानिक दृष्टिकोन में' या विषयावर आपले विचार मांडले.

प्राकृतिक चिकित्सा पद्धतीकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहण्याची आवश्यकता स्पष्ट करत त्यांनी निसर्गाशी सुसंगत जीवनशैली आणि नैसर्गिक उपचारपद्धतींचे महत्त्व विशद केले. डॉ. श्रद्धा प्रशांत यांनी 'आहार चिकित्सा द्वारा कठिन रोग निर्मूलन' या विषयावर मार्गदर्शन केले. शरीर निरोगी ठेवण्यासाठी संतुलित आणि योग्य आहाराचे महत्त्व स्पष्ट करताना आहाराचा आरोग्यावर होणारा परिणाम, आहारविषयक योग्य सवयी आणि आरोग्य संवर्धनातील आहार चिकित्सेची भूमिका याबाबत त्यांनी माहिती दिली. या कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आणि सर्जनशील विचारांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये निबंध लेखन, पोस्टर निर्मिती आणि घोषवाक्य स्पर्धांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी प्राकृतिक चिकित्सा, नैसर्गिक उपचारपद्धती, योग, आरोग्यदायी आहार आणि निरोगी जीवनशैली या विषयांवर आपले विचार प्रभावीपणे मांडले. पोस्टर आणि घोषवाक्यांच्या माध्यमातून आरोग्यविषयक जनजागृतीचा संदेश देण्यात आला. या स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी विविध स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके आणि प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रवंदनेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. एकूणच या उपक्रमाच्या माध्यमातून प्राकृतिक चिकित्सा ही केवळ उपचारपद्धती नसून निरोगी आणि संतुलित जीवन जगण्याची एक महत्त्वपूर्ण दिशा असल्याचा संदेश देण्यात आला.

योग, प्राणायाम, संतुलित आहार, निसर्गाशी सुसंगत जीवनशैली आणि आरोग्यविषयक जागरूकता या गोष्टींचा दैनंदिन जीवनात समावेश केल्यास निरोगी समाजनिर्मितीला निश्चितच हातभार लागू शकतो, हा विचार कार्यक्रमातून प्रभावीपणे मांडण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. युवराज काळे, स्वास्थवृत्त व योग विभागप्रमुख डॉ. माधवी रेहपाडे, डॉ. ममता तलमले, डॉ. ओमप्रकाश गुल्हाने, डॉ. शरयू डिंगल्वार, डॉ. रूपाली भणारे, डॉ. स्नेहल भामकर, डॉ. प्रमोद माळवे, डॉ. निखिल भुते आणि डॉ. राहुल गडूमवार यांच्यासह आयोजक समितीतील सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

बालकामगार प्रथा रोखण्यासाठी जनजागृती करा, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई

दे. सिंहवाणी वृत्त, नागपूर : बालकांचे शिक्षण आणि आरोग्य हे भारतीय राज्यघटनेने मान्य केलेले मूलभूत अधिकार आहेत. बालकांचे हे अधिकार अबाधित राखण्यासाठी बालमजुरीची प्रथा कायमस्वरूपी नष्ट होणे आवश्यक आहे. बालकामगार प्रथा ही सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक समस्यांशी निगडित असल्याने तिच्या विरोधात व्यापक जनजागृती करण्याची गरज आहे. १४ नोव्हेंबर हा बालदिन असून या दिवसाचे औचित्य साधून दरवर्षी बालकामगार प्रथा विरोधी सप्ताह साजरा करण्यात येतो. या सप्ताहाच्या माध्यमातून बालमजुरीचे दुष्परिणाम, बालकांचे शिक्षणाचे अधिकार आणि बालकामगार प्रतिबंधक कायद्याबाबत जनजागृती केली जाते. केंद्र शासनाने बाल व किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ लागू केला आहे. या कायद्यानुसार १४ वर्षाखालील बालकांना कोणत्याही व्यवसायात अथवा प्रक्रियेत कामावर ठेवणे प्रतिबंधित आहे. तसेच १४ वर्षे पूर्ण झालेल्या मात्र १८ वर्षे पूर्ण न झालेल्या किशोरवयीन मुलांना धोकादायक उद्योग व प्रक्रियांमध्ये कामावर ठेवणे हा गुन्हा आहे. बालमजुरीमुळे बालकांच्या शिक्षणावर, आरोग्यावर आणि सर्वांगीण विकासावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे बालकामगार प्रथा निर्मूलनासाठी समाजातील सर्व घटकांनी पुढाकार घेऊन बालकांच्या हक्कांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. या कायद्याचे उल्लंघन करून बालकांना अथवा किशोरवयीन मुलांना कामावर ठेवणाऱ्या मालक किंवा नियोक्त्याला सहा महिने ते दोन वर्षांपर्यंत कारावास किंवा २० हजार ते ५० हजार रुपयांपर्यंत दंड अथवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. नागपूर जिल्ह्यातील सर्व दुकाने व आस्थापनाधारक, उद्योजक, बांधकाम व्यावसायिक, विटभट्टी मालक तसेच इतर आस्थापनांच्या मालकांनी बालकामगार अथवा किशोरवयीन कामगारांना कायद्याने प्रतिबंधित असलेल्या कामांवर नियुक्त करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

सावनेर खानगाव उड्डाणपूलाजवळ भीषण अपघातात वैभव मनोरेचा मृत्यू



दे. सिंहवाणी वृत्त, सावनेर

सावनेर येथून आपल्या खानगाव या गावी जात असताना वैभव इंद्रजित मनोरे (वय १९ वर्षे, रा. खानगाव) याच्या मोटारसायकलला अज्ञात वाहनाने धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात वैभव गंभीर जखमी झाला.

वैभव हा कामानिमित्त सावनेर येथे आला होता.मोटारसायकल क्रमांक MH40DH2885 ने तो आपल्या गावी जात असताना हा अपघात घडला. घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी जखमी वैभवला हितज्योती आधार फाउंडेशनच्या रुग्णवाहिकेद्वारे सावनेर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले.व मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून, या अपघातप्रकरणी पुढील तपास सावनेर पोलीस करीत आहेत.

एका १९ वर्षीय तरुणाचा अशा प्रकारे दुर्दैवी अंत झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

केळवद पोलीस स्टेशन हद्दीतील कवठा हत्तीसरा परिसरात असलेल्या डोलामाईट तसेच भुरका रांगोळी खाणीतून दररोज अनेको कंन्टेनर, ट्रक खानगाव या गावातून निघून घटनास्थळा नजिकच्या उड्डाणपूलावर चढत नागपुर च्या दिशेने परिवहन करतात तर ढालगाव खैरी परिसरात असलेल्या नाल्यातून अवैधरित्या रेतीचा उपसा करणार्या ट्रैक्टर या दोन पैकी कोणत्यातरी वाहनाच्या धडकेत सदर अपघात घडला असावा असे बोलल्या जात असुन खानगाव तसेच मार्गावरील सुरक्षा कैमेरे तसेच डोलामाईट व रांगोळी खाणी वरुन घटना दरम्यान निघालेल्या वाहनांचा योग्य तपास केल्यास अपघात कोणत्या वाहनाने झाला याचा छडा लागु शकतो.

सदर घटनेची सुचना प्राथमिक आरोग्य प्रशिक्षण केन्द्र सावनेर येथून एमएलसीच्या माध्यमातून हाकेच्या अंतरावर असलेल्या सावनेर पोलीस स्टेशनला दिली असता जवळपास आर्धा पाऊन तास कोणताही पोलीस अधिकारी कर्मचारी पोहचले नसल्याने व दवाखान्याबाहेरील वातावरण तापू लागले असता सावनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष किशोर ढुढेले यांनी सुद्धा पोलीस स्टेशन सावनेरच्या क्रमांकावर फोन केले. परंतू कुणीही फोन न उचलल्यामुळे उपविभागीय पोलीस अधिकारी सागर खडें यांना सदर घटनेची माहीती दिली व त्यांचे माध्यमातून पोलीस अधिकारी यांनी प्राथमिक माहिती व गोळा करत मृतदेह शवविच्छेदना करिता रवाना केला.

कवठा हत्तीसरा, ढालगाव, खानगाव मार्गाने होत असलेली जड वाहतूक थांबवा

कवठा, हत्तीसरा, ढालगाव, खानगाव मार्गाने भरधाव चालणाऱ्या या मोठ्या कंटेनर थांबवीण्याचे प्रयत्न खानगाव निवासी यांनी अनेकदा केले परंतु बळजबरीने सदर मार्गावर अवैधरित्या धावत असलेल्या कंटेनरचे परिवहन सदर मार्गावर थांबवीण्याची मागणी जोर धरु लागली आहे.

थोडक्यात

बेलदा, नवेगाव, गोरेघाट येथील युवकांचा शिवसेनेत जाहीर पक्षप्रवेश

राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या उपस्थितीत युवकांनी हाती घेतला शिवसेनेचा भगवा



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्ववादी विचारांचा वारसा आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्यनेते एकनाथ शिंदे तसेच राज्यमंत्री अँड. आशिष जयस्वाल यांच्या विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत रामटेक तालुक्यातील बेलदा, नवेगाव आणि गोरेघाट येथील युवकांनी गुरुवार, दिनांक १९ नोव्हेंबर २०२६ रोजी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या रामटेक येथील जनसंपर्क कार्यालयात हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. रामटेक तालुका शिवसेना संघटक आकाश पंधरे यांच्या नेतृत्वात युवकांनी राज्यमंत्री जयस्वाल यांच्या उपस्थितीत शिवसेनेचे सदस्यत्व स्वीकारले.

यावेळी बोलताना राज्यमंत्री आशिष जयस्वाल म्हणाले की, युवकांचा शिवसेनेकडे वाढता ओढा आणि संघटनेवरील विश्वास हीच पक्षाची खरी ताकद आहे. युवकांच्या हक्कांसाठी, सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी तसेच समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिवसेना सदैव खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभी राहील. नव्या युवकांच्या सहभागामुळे संघटनेला अधिक बळ मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. या पक्षप्रवेश सोहळ्यात बेलदा, नवेगाव व गोरेघाट येथील संतोष चापले, हेमराज भट, विनोद भट, विलास जैस्वाल, इंद्रकुमार कुमरे, मधुकर भट, अर्जुन कुंभरे, मिताराम कुंभरे, हरिदास कुंभरे, धनुपंडा कुंभरे, लक्ष्मण टेकाम, पंकज टेकाम, दशरथ वरठी, दुलीचंद भट आणि बळीराम सर्याम यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी रामटेक तालुका शिवसेना संघटक आकाश पंधरे, बेलदा येथील शिवसेना शाखाप्रमुख श्रावण बोपटे उपस्थित होते. राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी सर्व नवप्रवेशित युवकांचे शिवसेना परिवारात स्वागत करून त्यांचे अभिनंदन केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नागपूर ग्रामीणच्यावतीने जनसेवा सप्ताह



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

तालुक्यामध्ये लोकसेवा उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल माननीय जिल्हाध्यक्ष राजाभाऊ टाकसाळे यांच्यावतीने मनीष खोब्रागडे यांना शिल्ड देऊन सत्कार करण्यात आला. व असाच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून लोकांच्या सेवा व्हावी अशी भूमिका घेण्यात आली. उपस्थित नागपूर जिल्हा महासचिव किरण झाडे, राष्ट्रवादी काँग्रेस नेते किशोर बेलसरे रामटेक विधानसभा अध्यक्ष गणेश पानतावणे, सामाजिक न्याय विभाग नागपूर जिल्हा अध्यक्ष नरवाडे, राष्ट्रवादी काँग्रेस विद्यार्थी विंगच्या विदर्भाध्यक्ष माधुरीताई पालीवाल, पुंडलिक राऊत उमरेड विधानसभा अध्यक्ष, नागपूर ग्रामीण तालुकाध्यक्ष पुष्कर बंडावार, अभय वानखेडे रामटेक शहर उपाध्यक्ष, रवींद्र मेश्राम तालुका उपाध्यक्ष,अमर सहारे यांचा समावेश होता.

खासदार डॉ. नामदेव किरसान यांच्या पाठपुराव्याला यश

राष्ट्रीय महामार्ग क्र. ९३० च्या मजबुतीकरणासाठी ४५.७९ कोटींचा निधी मंजूर, धावडी-गडचिरोली मार्गाच्या विकासाला मिळणार गती; नागरिक व वाहनधारकांना मोठा दिलासा

दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९३० वरील धावडी ते गडचिरोली या मार्गाच्या मजबुतीकरणासाठी केंद्र सरकारच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने तब्बल ४५.७९ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी या रस्त्याच्या दुरवस्थेकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधून सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. छत्तीसगड-महाराष्ट्र सीमा ते धावडी-गडचिरोली या राष्ट्रीय महामार्गाच्या ४६.५० किलोमीटर लांबीच्या रस्त्याची दुरवस्था लक्षात घेता, या मार्गाचे मजबुतीकरण व सुधारणा करण्याची मागणी खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी केंद्र सरकारकडे केली होती. वासंदर्भात त्यांनी १८ जून २०२६ रोजी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाकडे पत्राद्वारे मागणी सादर केली होती.



या मागणीची दखल घेत केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग राज्यमंत्री अजय टमटा यांनी ३० ऑक्टोबर २०२६ रोजी पत्र पाठवून ४६.५० किलोमीटर लांबीच्या रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी ४५.७९ कोटी रुपयांच्या कामाला मंत्रालयाकडून मंजुरी देण्यात आल्याची माहिती खासदार डॉ. नामदेव किरसान यांना दिली आहे. या कामामुळे धावडीझगडचिरोली मार्गावरील रस्त्यांची गुणवत्ता सुधारण्यासोबतच प्रवाशांचा प्रवास अधिक सुरक्षित आणि सुकर होण्यास मदत होणार आहे. तसेच वाहतुकीतील अडथळे कमी होऊन नागरिक, वाहनधारक आणि व्यापाऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. गडचिरोली जिल्ह्याच्या दळणवळणाच्या दृष्टीने हा महामार्ग अत्यंत महत्त्वाचा असून, रस्त्याच्या मजबुतीकरणामुळे परिसराच्या विकासाला चालना मिळणार आहे. नागरिकांना दर्जेदार रस्ते सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी खासदार डॉ. नामदेव किरसान यांच्याकडून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. एकूणच, राष्ट्रीय महामार्ग क्र. ९३० च्या मजबुतीकरणासाठी ४५.७९ कोटी रुपयांचा निधी मंजूर होणे ही परिसराच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण बाब मानली जात आहे.

राज्यात आता ३१० तालुके दुष्काळी

मुख्यमंत्र्यांशी चर्चेनंतर हातकणंगले, गडहिंग्लजचा नव्याने समावेश, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती, अपूर्ण नळ योजनांसाठी ४८८ कोटी, जलसंधारणासाठी ५ हजार कोटींचा आराखडा होणार

दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

राज्यातील दुष्काळी तालुक्यांची संख्या ३१० वर पोहोचली आहे. विक्रमगड, वाडा, दिंडोरी आणि चिपळूण या सोबतच हातकणंगले व गडहिंग्लज या तालुक्याचा दुष्काळ यादीत समावेश करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आल्याचे महसूलमंत्री तथा दुष्काळ निवारण उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

पत्रकारांशी बोलताना मंत्री बावनकुळे म्हणाले, आणखी १३ तालुक्यांचा शिफारशींबाबत सर्वेक्षण करून तपासणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तर कोल्हापूर जिल्ह्यातील नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या दोन तालुक्यांसाठी मंत्री हसन मुश्रीफ तसेच स्थानिक आमदार अशोकराव माने आणि शिवाजी पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा केला.

फायनान्स कंपनीचा नको तगादा

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मायक्रो फायनान्स कंपन्या किंवा बँकांकडून तगादा लावून वेठीस धरले जात असल्यास शेतकऱ्यांनी आत्महत्या न करता स्थानिक लोकप्रतिनिधी, पोलिस, जिल्हाधिकारी किंवा प्रशासनाकडे तक्रार करावी. दुष्काळ काळात कोणतीही फायनान्स कंपनी तगादा लावणार नाही, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

अपूर्ण नळ योजनांसाठी ४८८ कोटी; वीज जोडणी व थकबाकीवर निर्णय

राज्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी ज्या नळ योजनांचे ७५ टक्के काम पूर्ण झाले आहे आणि केवळ २५ टक्के काम शिल्लक असल्याने ठेकेदार सुरू करावे लागत आहेत, अशा अपूर्ण पाणीपुरवठा योजना तातडीने पूर्ण करण्यासाठी ४०० कोटी रुपये आणि १०-२० टक्के किंवा ५-१० टक्के काम शिल्लक असलेल्या योजनांसाठी ८८ कोटी रुपये, असे एकूण ४८८ कोटी रुपये पाणीपुरवठा विभागाला देण्यात आले आहेत. आधीच मंजूर निविदा व वर्क ऑर्डरनुसार जिल्हा परिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून ही कामे पूर्ण करून टँकर बंद करण्याचे निकष जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. वीज कनेक्शनअभावी रखडलेल्या राज्यातील सुमारे ४०० ते ५०० नळ योजनांना डीपीसी निधीतून वीज जोडणी दिली जाईल. तसेच वीज बिल थकल्याने कनेक्शन कापलेल्या योजनांचे मागील बिल थकीत ठेवून केवळ चालू बिल घेत तात्काळ वीज जोडणी सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

एल निनोच्या प्रभावामुळे राज्यात निर्माण झालेल्या पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर क्षेत्रीय स्तरावर टंचाई निवारणार्थ उपाययोजना आल्याचेही त्यांनी सांगितले.

तात्पुरती पूरक नळ पुरवठा योजना

- जिल्हाधिकाऱ्यांना ४० लक्ष रुपये - विभागीय आयुक्तांना एक कोटी रुपये

नळपाणी पुरवठा योजनांची विशेष दुरुस्ती - ६० लक्ष रुपये - १ कोटी रुपये

पिण्याच्या पाण्याचे टँकर भरण्यासाठी आवश्यक ती तात्पुरती उपाययोजना करणे - १ लक्ष रुपये - २ लक्ष रुपये

बैलगाडीने पाणी पुरवठा करणे - प्रती दिन प्रती बैलगाडी ३००० रुपये

१५ हजार गावे समृद्ध करण्याचे उद्दिष्ट

राज्यातील घटती भूजल पातळी लक्षात घेऊन 'कमी पैशात जास्त जलसंधारण' या भूमिकेतून मृत बंधारे आणि जुने तलाव पुनर्जीवित करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. प्रत्येक जिल्ह्यातील ४ ते ५ हजार मृत बंधारे, गाव तलाव, साठवण तलाव, मालगुजारी तलाव, जलसंपदा व जलसंधारणाचे तलाव, ग्रामपंचायतीचे तलाव तसेच शिवकालीन बंधारे दुरुस्त करून जिवंत केले जातील. पावसाळ्यातील थेंब न् थेंब पाणी गावात, शेतात, तलावात आणि नाल्यात साठवून पुढील तीन वर्षांत १५ हजार गावे समृद्ध करण्याचे नियोजन आहे. याकरता पाच सचिवांची समिती एसओपी व आराखडा तयार करणार असून डिसेंबरच्या बजेटमध्ये या योजनेला मूर्त रूप देत सुमारे ५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यास मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली आहे.

सांडपाण्यावर 'झिरो डिस्चार्ज' व पुनर्वापर

पाणीटंचाई व दुष्काळी भागात पिण्याच्या पाण्याचा वापर करून सिमेंट रस्ते बांधण्याऐवजी गरज पडल्यास खडीकरण किंवा डांबरीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महानगरपालिका आयुक्त, सर्व नगरपालिकेचे सीईओ, नगराध्यक्ष, महापौर व लोकप्रतिनिधींची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत संयुक्त बैठक घेण्याचे नियोजन आहे. एखाद्या ठिकाणी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातील (एसटीपी) टर्शरी वॉटर वापरून सिमेंट रस्ता करायचा असल्यास त्याबाबत जिल्हाधिकारी निर्णय घेऊ शकतील. मात्र मोठ्या सिमेंट रस्ते कामांसह सर्व प्रकल्प, उद्योग (एमआयडीसी), वीज प्रकल्प व उद्यानांसाठी पिण्याचे पाणी न वापरता प्रक्रिया केलेले सांडपाणीच वापरावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. नागपूरमधील कोराडी वीज प्रकल्पाप्रमाणे सर्व महापालिका व नगरपालिकांनी 'झिरो डिस्चार्ज' धोरण राबवून सांडपाणी नदी-नाल्यात न सोडता त्याचा पुनर्वापर करावा, अशी भूमिका बावनकुळे यांनी स्पष्ट केली.

दादर स्थानक नामांतराच्या निर्णयबाबत मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन

दादर रेल्वे स्थानकाला चैत्यभूमी नाव देण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेऊन वर्षानुवर्षे प्रलंबित असलेली जनभावना पूर्ण केली आहे. हा निर्णय ऐतिहासिक असून याला कोणीही विरोध करू नये. मनसे किंवा शिशिर शिंदे यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या भूमिकेचा संदर्भ देत केलेली विधाने त्यांचे वैयक्तिक मत असले, तरी जनतेची मागणी महत्त्वाची आहे.

परभणी येथील अहिल्यादेवी स्मारक

परभणी येथील अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारकाचे रखडलेले काम विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून, तसेच रखाकर गुट्टे यांच्या निवेदनावर कारवाई करत आजपासून पुन्हा सुरू करण्यात येत आहे. अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा तालुक्यातील १५०० मेगावॅट जलविद्युत प्रकल्पाबाबत वाघ व बिबट्यांचा अधिवास तसेच संभाव्य नुकसानीची लेव्हल तपासून चर्चा करून कोणतेही नुकसान होणार नाही याची काळजी घेतली जाईल, असे ते म्हणाले.

विरोधकांचा समाचार

मतदार यादीतील मयत व दुबार नावे कमी करण्यासाठी 'एसआयआर' प्रक्रिया असून त्यावर उद्धव ठाकरे यांनी केलेली टीका निराधार व नकारात्मक नरेटिव्ह निर्माण करणारी आहे. मयत किंवा स्थलांतरित व्यक्तींची नावे ठेवून निवडणुका जिंकता येणार नाहीत, असा टोला बावनकुळे यांनी लगावला. गरिबी पूर्णपणे हटलेली नसली तरी गेल्या १२ वर्षांत केंद्र सरकारच्या योजना व मानव संसाधन विकासामुळे गरिबांचे राहणीमान उंचावून गरिबीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी झाले आहे. परदेश दौऱ्यांवरून राहुल गांधी यांच्यावर टीका करताना देशाची बदनामी करणे ही बेईमानी व देशद्रोहीपणाची वृत्ती असल्याचा आरोप बावनकुळे यांनी केला, तर दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ३५ पेक्षा अधिक देशांनी सर्वोच्च सन्मान देऊन भारताचा गौरव केल्याचे नमूद केले. शायना एनसी यांच्याबाबत झालेल्या प्रकरणावरून शिवसेना (उबाठा) करत असलेले आंदोलन अनावश्यक असून एखाद्या महिलेकडून अनावधानाने चूक होऊन तिने माफी मागितल्यानंतर त्याचे राजकारण करणे योग्य नाही. तसेच स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अपमान सोनिया गांधी व राहुल गांधी यांच्यासह गांधी परिवाराने वारंवार केला असून या मुद्द्यावर उद्धव ठाकरे यांनी मौन न बाळगता भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणीही बावनकुळे यांनी केली.

वारकरी साहित्य परिषदेचा १५ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

गावोगावी हरिपाठ मंडळ स्थापन करण्याचा निर्धार, ह.भ.प. डॉ. प्रदीप महाराज इंगळे महाराज

दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड / शिवनगर



वारकरी साहित्य परिषदेचा १५ वा वर्धापन दिन सोहळा संत श्री गजानन महाराज मंदिर, शिवनगर, उमरेड या ठिकाणी मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प. श्री विठ्ठल पाटील काकाजी हे होते. कार्यक्रमाचे आयोजक विदर्भ अध्यक्ष ह.भ.प. डॉ. प्रदीप महाराज इंगळे, नागपूर, तर महिला जिल्हा अध्यक्ष ह.भ.प. मोनाली इंगळे या होत्या. सायंकाळी दिंडी प्रदक्षिणा काढण्यात आली. तालुका पंचक्रोशीतील महिला हरिपाठ भजन मंडळ दिंडीकरिता बोलावण्यात आले होते. दिंडीमध्ये वेगवेगळ्या वेशभूषा सादरीकरण होते. छत्रपती शिवाजी महाराज राणी लक्ष्मीबाई ज्ञानोबाराया तुकोबाराया विठोबा अशा पद्धतीचे रंगीत वेशभूषा करण्यात आली दिंडी प्रदक्षिणा मारून गजानन मंदिरामध्ये राम कृष्ण हरी नामजप करण्यात आला. त्यानंतर मान्यवर मंडळींनी आपापले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाला वारकरी साहित्य परिषद नागपूर जिल्हा व उमरेड तालुक्यातील सर्व पदाधिकारी उपस्थित होते. त्यामध्ये ह.भ.प. डॉ. प्रदीप महाराज इंगळे, ह.भ.प. शंकर महाराज कावळे, ह.भ.प. अमृत महाराज सरोदे, ह.भ.प. विकास महाराज कानझोडे, ह.भ.प. अनिकेत महाराज शेंडे, ह.भ.प. प्रवीण महाराज कोल्हे, ह.भ.प. मच्छिंद्र महाराज कोल्हे ह भ प पंकज महाराज खंडाईत यांचा समावेश होता.

महिला कार्यकारिणीमध्ये ह.भ.प. मोनाली इंगळे, ह.भ.प. लतताई माळवे, ह.भ.प. सौ. संगीता ताई पडोळे, ह.भ.प. कांचन ताई गुरुमुले यांच्यासह सर्व कार्यकारिणी व महिला मंडळी उपस्थित होत्या. तसेच अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होती. गावागावांमध्ये हरिपाठ पोहोचवावा, गावागावांमध्ये हरिपाठ मंडळ तयार व्हावे, या दृष्टिकोनातून हा कार्यक्रम फारच सुंदर आणि यशस्वीरित्या पार पडला. सर्वांना आवाहन करण्यात आले की, प्रत्येकाने आपापल्या गावांमध्ये हरिपाठ मंडळ स्थापन करावे, जनाई-मुक्ताई मंडळाची स्थापना प्रत्येक गावोगावी व्हावी, हरिपाठाची सुरुवात व्हावी, गावागावात हरिपाठ पोहोचवावा.

ह. भ. प. मोनाली इंगळे यावेळी मार्गदर्शन करताना सांगण्यात आले की, एक स्त्री ही फक्त चूल आणि मूल याकरताच नाही, तर याच्याही पुढे ती गेली पाहिजे. तिने परमार्थात सुद्धा आपले पाऊल पुढे नेले पाहिजे. कारण स्त्री ही साधारण नसून स्त्री ही झाशीची राणी आहे, स्त्री ही जनाबाई आहे, स्त्री ही मुक्ताई आहे, ती एक आदिशक्ती आहे.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ह भ प सुरज महाराज मोहरले यांनी केले. त्यानंतर सर्वांनी मिळून ज्ञानेश्वर माऊलींचे पसायदान घेतले. माऊलींचा गजर झाला, पुंडलिक वरदे हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम असा जयघोष करण्यात आला. नंतर सर्वांनी अल्पोपहार करून कार्यक्रमाची सांगता केली.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातील उत्कृष्ट ग्रामपंचायतींचा आज विभागीय पुरस्काराने गौरव

नागपूर विभागीय पुरस्कार वितरण सोहळा; कार्यशाळा, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि दुष्काळावर मात व समृद्ध गावाचा संकल्प विषयावर परिसंवाद

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२५-२६ अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींचा विभागीय स्तरावरील पुरस्कार वितरण सोहळा २० नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता कविवर्य सुरेश भट सभागृह येथे आयोजित करण्यात आला आहे. जिल्हा परिषद आणि विभागीय आयुक्त कार्यालयाद्वारे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णयानुसार राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या कालावधीत १७ सप्टेंबर २०२५ ते ३१ मार्च २०२६ या दरम्यान सहभागी ग्रामपंचायतींचे तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरीय मूल्यमापन करण्यात आले असून या मूल्यमापनातून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसुल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. यावेळी आदिवासी विकास मंत्री अशोक वुईके, राज्यमंत्री अँड आशिष जयस्वाल, राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर, राज्यमंत्री इंद्रनिल नाईक, राज्यमंत्री योगेश कदम प्रमुख अतिथी म्हणून तसेच राज्यसभा व लोकसभा सदस्य, विधान परिषद व विधानसभा सदस्य उपस्थित राहणार आहे. या सोहळ्यात नागपूर विभागातील पुरस्कारप्राप्त ग्रामपंचायतींचा सन्मान करण्यात येणार असून, अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींच्या यशोगाथांचे सादरीकरण प्रेरणादायी ठरणार आहे.

एमकेएम खो-खो प्रीमियर लीगचा लोगो अनावरण सोहळा उत्साहात

सहा संघांसाठी खेळाडूंचा झाला लिलाव

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्र क्रीडा मंडळ, नागपूर यांच्या वतीने आयोजित एमकेएम खो-खो प्रीमियर लीगच्या तिसऱ्या पर्वाचा लोगो अनावरण, फ्लॅग वितरण आणि खेळाडूंचा लिलाव मंगळवारी धनवटे नॅशनल कॉलेजच्या एमबीए भवन, कॉग्रेसनगर येथे उत्साहात पार पडला.

एमकेएम खो-खो प्रीमियर लीगचे तिसरे पर्व ४ ते ६ डिसेंबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे. या स्पर्धेत एमकेएम डिफेंडर्स, स्विफ्ट पँथर्स, राजमुद्रा वॉरियर्स, ऑरेंजसिटी लायन्स, स्पोर्ट्स कर्मा आणि निर्मय धुरंधर हे सहा संघ सहभागी होणार आहेत.

या कार्यक्रमाला महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे नागपूर विभागाचे उपसंचालक महादेव कासगावडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. सरस्वती विद्यालय, नागपूरच्या मुख्याध्यापिका डॉ. रेश्मी उमेश यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. हौशी जिल्हा खो खो संघटना सचिव चंद्रकांत आसोले, शारीरिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष अशपाक शेख, महाराष्ट्र क्रीडा मंडळ, नागपूरचे सचिव पद्माकर चारमोडे, संयोजक डॉ. संजय चौधरी यांची मंचावर उपस्थित होती. प्रास्ताविक पद्माकर चारमोडे यांनी तर सूत्रसंचालन आरजे आमोद व वैभव कुमरे यांनी केले.



एमकेएम डिफेंडर्स संघाचे मार्गदर्शक शैलेंद्र ढोले, मुख्य प्रशिक्षक मनोज गोटेकर आणि सहायक प्रशिक्षक वंश शेंडे, स्विफ्ट पँथर्स संघाचे मार्गदर्शक परेश भिडे व श्री माकडे, सुधीर चिटणीस, मुख्य प्रशिक्षक प्रेम राखडे आणि सहायक प्रशिक्षक चेतन दोनाडकर, राजमुद्रा वॉरियर्स संघाचे मार्गदर्शक सोनल रईच, मुख्य प्रशिक्षक सौरभ कुमार दुबे आणि सहायक प्रशिक्षक हिमांशू वाघाडे, ऑरेंजसिटी लायन्स संघाची जबाबदारी सांभाळणारे परेश इटकलवार, श्री पवार, मार्गदर्शक निखिल गोटमारे, मुख्य प्रशिक्षक प्रगती निंबार्ते आणि सहायक प्रशिक्षक शंतनू धारगावे यांच्यासह स्पोर्ट्स कर्मा संघाचे मार्गदर्शक अनिल बनकर, मुख्य प्रशिक्षक रोहित गंडाईत आणि सहायक प्रशिक्षक यश वानखेडे व निर्मय धुरंधर संघाचे मालक नयन व नेहा घाटे, मार्गदर्शक राजेश्वर मोवाडे, मुख्य प्रशिक्षक आकाश बालपांडे आणि सहायक प्रशिक्षक पीयूष राठोड यांनी लिलावात सहभाग घेतला.

याप्रसंगी महाराष्ट्र क्रीडा मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. विजय दातारकर, कोषाध्यक्ष समीर चिटणीस, सहसचिव डॉ. राजू राऊत, समीर लोही, सचिन देशमुख, डॉ. अतुल कुलकर्णी, कु. सरिता घरत, विविध क्रीडा मंडळाचे पदाधिकारी, क्रीडा प्रेमी उपस्थित होते.